कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | मंगळवार | दि. ३ नोव्हेंबर २०२६ | अंक १४८ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

साई इन रिसॉर्ट चोंढी
अलिबाग येथे रुमबॉय व गार्डनसाठी व्यक्ती पुरुष/स्त्री पाहिजेत. (अपंग व्यक्ती चालेल) अर्जासह भेटा.

फटाके टाळा, प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा!

मुंबई : दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आतषबाजीऐवजी पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ देण्यात येणार आहे. याबाबत शिक्षण संचालनालयाने परिपत्रक जारी करून सर्व शैक्षणिक संस्थांना अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने १५ ऑक्टोबर रोजी दिलेल्या आदेशानुसार सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

धमक्यांच्या ई-मेलने रायगड अलर्ट!

■ जिल्हा न्यायालयासह अन्य न्यायालयांतील सुरक्षेत वाढ

■ बॉम्बशोधक पथकाकडून कसून तपासणी



न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, न्यायालयात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाची तपासणी केली जाणार आहे. तसेच जिल्ह्यातील अन्य न्यायालयांमधील सुरक्षाही अधिक कडक करण्यात येणार असल्याची माहिती अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी दिली.

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून उडवून देण्याच्या धमक्या ई-मेलद्वारे मिळाल्याने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सुरक्षा यंत्रणाही अलर्ट मोडवर आली असून, सोमवारी (दि. २) अलिबाग येथील जिल्हा न्यायालयात पोलिसांसह बॉम्बशोधक व नाशक पथकाने कसून तपासणी केली. न्यायालयाचा परिसर रिकामा करून प्रत्येक विभागाची बारकाईने तपासणी करण्यात आली. सुदैवाने तपासणीदरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. मात्र, राज्यभरातील न्यायालयांना मिळालेल्या धमक्यांचे गांभीर्य लक्षात घेता रायगडमधील जिल्हा न्यायालयासह अन्य न्यायालयांमधील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली यांसह विविध जिल्ह्यांतील न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याचे धमकीचे ई-मेल प्राप्त झाले. या प्रकारामुळे न्यायालयीन वर्तुळासह पोलीस यंत्रणेतही मोठी खळबळ उडाली. राज्यातील न्यायालयांना लक्ष्य करण्याच्या धमक्या मिळत असल्याने रायगड पोलिसांनीही खबरदारीचा उपाय म्हणून तातडीने सुरक्षा तपासणी सुरू केली.

सोमवारी सकाळी जिल्हा न्यायालयातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक कामकाजात व्यस्त असतानाच अचानक पोलिसांचा मोठा फौजफाटा न्यायालयात दाखल झाला. बॉम्बशोधक व नाशक पथक, डॉग स्कॉड, अलिबाग पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा शाखा आणि जिल्हा विशेष शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शंभरहून अधिक जणांच्या पथकाने न्यायालयाचा ताबा घेतला. खबरदारी म्हणून न्यायालयाचा परिसर रिकामा करण्यात आला. त्यानंतर न्यायालयीन इमारत, •➤पान २ वर

ठाणे, सांगली, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांत खळबळ

■ न्यायालयीन इमारती रिकाम्या करून तपासणी

मुंबई : राज्यातील ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी आणि हिंगोलीसह विविध जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून उडवून देण्याचे धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्याने सोमवारी राज्यभर खळबळ उडाली. ठाणे जिल्हा न्यायालयाच्या रजिस्ट्रार कार्यालयाला सकाळी ९.४३ वाजता पंजाबी भाषेत धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. दुपारी ३.११ वाजता आयईडी बॉम्बचा स्फोट घडविण्याचा उल्लेख या ई-मेलमध्ये करण्यात आला होता. यानंतर न्यायालयीन इमारती तातडीने रिकाम्या करून न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

सांगली, सोलापूरसह बीड, परभणी आणि हिंगोली येथील न्यायालयांमध्येही बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाच्या मदतीने तपासणी करण्यात आली. दरम्यान, मुंबईतील मेट्रो स्थानके तसेच २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या दिलजीत दोसांझ यांच्या कार्यक्रमातही स्फोट घडविण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. धमकीचे ई-मेल नेमके कुठून पाठविण्यात आले, याचा शोध गुन्हे शाखा आणि सायबर पोलिसांकडून घेतला जात आहे.

वे|ध|क

पत्नीसह मुलीची हत्या करणाऱ्याला जन्मठेप

पनवेल : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पत्नी आणि अवघ्या सहा वर्षांच्या चिमुरडीची निर्घृण हत्या करणाऱ्या श्रीमंत नागरगोजे याला पनवेल जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. २०१६ मध्ये घडलेल्या या दुहेरी हत्याकांडानंतर आरोपीने ओळख बदलून गोव्यात आश्रय घेतला होता. तब्बल चार वर्षे पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला २०२० मध्ये पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने अटक केली होती. सातारा जिल्ह्यातील रहिवासी असलेला श्रीमंत नागरगोजे ट्रेलरचालक म्हणून काम करत होता. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने त्यांच्यात वारंवार वाद होत होते. घटनेच्या दिवशी तो जेजुरी येथून पत्नी आणि सहा वर्षांच्या मुलीला ट्रेलरमधून पनवेल येथे घेऊन आला. •➤पान २ वर

आजपासून रायगड किल्ल्यावर रोप-वे सुरू

रायगड : दिवाळीच्या सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर पर्यटक आणि शिवप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावरील रोप-वे सेवा मंगळवार (दि. ३) पासून पुन्हा पर्यटकांच्या सेवेत दाखल होत आहे. नियमित देखभाल आणि दुरुस्तीच्या कामासाठी २१ सप्टेंबरपासून बंद ठेवण्यात आलेली ही सेवा तब्बल दीड महिन्यानंतर पूर्ववत सुरू होत आहे. रोप-वे सेवा बंद असल्यामुळे पर्यटकांना पायथ्यापासून पायऱ्यांच्या मार्गाने गडावर जावे लागत होते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. अनेकांना शारीरिक अडचणींमुळे गडभेट टाळावी लागत होती.

दिवाळीपूर्वी शेअर बाजारात तेजी

मुंबई : शेअर बाजारात या आठवड्याची सुरुवात दमदार झाली असून, दिवाळीपूर्वीच तेजीची आतिषबाजी दिसून आली. शेअर बाजारासाठी दिवाळीच्या सणासुदीच्या आठवड्याची सुरुवात उत्साहवर्धक ठरली आहे. सोमवारी बाजार उघडताच खरेदीचा सपाटा सुरू झाला. व्यवहार संपताना, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १,२३३.२५ अंकांनी, म्हणजेच १.६६ टक्क्यांनी वाढून ७५,६९२.७८ अंकांवर बंद झाला. नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ३८७.७० अंकांनी, म्हणजेच १.६८ टक्क्यांनी वाढून २३,४४०.८० अंकांवर पोहोचला. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी गुंतवणूकदारांनी आठ लाख कोटी रुपये कमावल्याचे बोलले जात आहेत.

महेंद्र थोरवे टोरंटच्या दावणीला?

| अलिबाग | प्रतिनिधी |

कर्जतच्या जंगलात टोरंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पापूर्वीही दरवर्षी एक लाख वृक्षतोड होते, असा दावा आमदार महेंद्र थोरवे यांनी केल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे. मात्र, या दाव्याला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नसताना टोरंट प्रकल्पाच्या समर्थनासाठी थोरवेंची धडपड सुरू असल्याचा आरोप होत आहे. एकीकडे सायडोंगर, कोतवाल आणि पाली या तीन गावांतील जंगलात टोरंटच्या ३ हजार मेगावॅटच्या पंप स्टोरेज प्रकल्पासाठी ३२ हजार ४९० झाडे तोडण्याचा आकडा समोर असताना प्रत्यक्षात तीन लाख झाडांवर कुऱ्हाड येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र, या वृक्षतोडीच्या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करून थोरवेंना राष्ट्रवादी काँग्रेसवर टोलेबाजी करण्यातच अधिक रस असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांनी केला आहे. •➤पान २ वर

सुधाकर घारेंचा घणाघात

...तर राष्ट्रवादीने युतीतून बाहेर पडावे!

राष्ट्रवादी काँग्रेसने टोरंट प्रकल्पाला विरोध केल्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर पलटवार केला. सत्तेत राहून सरकारच्याच निर्णयाला विरोध करणे योग्य नाही. केंद्र आणि राज्य सरकारने मंजूर केलेला प्रकल्प नको असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेसने महायुतीतून बाहेर पडावे, असे वक्तव्य थोरवे यांनी केले.

> राष्ट्रवादी काँग्रेस आणि खासदार सुनील तटकरे यांची कायमच विकासाची भूमिका राहिली आहे. विकासाची भूमिका कायम ठेवूनच राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीत सामील झाली. प्रकल्प आले पाहिजेत; पण ते पर्यावरणपूरक असायला हवेत. विकासासोबतच पर्यावरणही तितकेच महत्त्वाचे आहे, हीच सुनील तटकरे यांची भूमिका आहे. राज्यात कोणत्या पक्षाने कुठे राहावे, हे सांगण्यासाठी आमदार महेंद्र थोरवेंच्या सल्ल्याची गरज नाही.
> – धनंजय देशमुख, प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस

> खालापूरमध्ये भरपूर कंपन्या असूनही महेंद्र थोरवेंनी इतक्या वर्षांत कोणत्याही स्थानिकाला कायम स्वरूपी नोकरीला लावलेले नाही. आता टोरंट प्रकल्प आल्यानंतर कर्जतमधील स्थानिकांना रोजगार देण्याचे आमिष दाखवत आहेत. थोरवेंना फक्त आणि फक्त कंत्राट हवे आहे. त्यामुळे स्वतःच्या फायद्यासाठी ते टोरंट प्रकल्पाचे इतके समर्थन करत आहेत. सह्याद्रीचा विनाश होत असताना सर्वजण या प्रकल्पाला विरोध करत आहेत. थोरवेंना हा प्रकल्प आणायचाच असेल, तर त्यांना माझे सांगणे आहे की, सह्याद्रीचा ऱ्हास करणारा प्रकल्प आम्हाला कोणालाच नको. – सुधाकर घारे, नेते, राष्ट्रवादी काँग्रेस

शेकापच्या संघर्षाला सोशल मीडियाची साथ



संघटनात्मक बांधणीसाठी प्रशिक्षण शिबीर उत्साहात

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाने आता डिजिटल माध्यमांवरही आपली ताकद वाढविण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून पक्षाच्या विचारांचा, आंदोलनांचा आणि जनहिताच्या लढ्यांचा आवाज अधिक व्यापक स्तरावर पोहोचवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाकडून रविवारी (दि. १) सोशल मीडिया प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई येथील पक्षाच्या कार्यालयात आयोजित या प्रशिक्षण शिबिरात सोशल मीडियाचा प्रभावी वापर, डिजिटल माध्यमांद्वारे पक्षाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचविणे, पक्षाच्या आंदोलनांना आणि जनहिताच्या प्रश्नांना व्यापक प्रसिद्धी देणे, तसेच आधुनिक डिजिटल साधनांचा वापर याबाबत शेकापच्या सोशल मीडिया सेलच्या प्रमुख तथा राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, पुरोगामी युवा संघटनेच्या अध्यक्षा •➤पान २ वर

गोकुळमध्ये महायुतीची कोंडी

■ उच्च न्यायालयाच्या निर्देशाने १० नोव्हेंबरला पुन्हा निवडणूक प्रक्रिया

| कोल्हापूर | प्रतिनिधी |

गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदावरून सुरू असलेल्या सत्तासंघर्षात महायुतीची कोंडी झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या सत्तासंघर्षाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने १० नोव्हेंबर रोजी अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे महायुतीच्या १२ संचालकांची भूमिका पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

शेतकरी कामगार पक्षासह पुरोगामी पक्षांच्या पाठिंब्याने आणि आ. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या समविचारी आघाडीचे १३, तर महायुतीचे १२ असे संख्याबळ असताना अध्यक्षपदाची निवडणूक टाळण्यासाठी २९ ऑक्टोबरच्या सभेला महायुतीचे १२ संचालक अनुपस्थित राहिले. परिणामी, गणपूर्तीअभावी सभा तहकूब करण्यात आली. त्यानंतर समविचारी आघाडीच्या १३ संचालकांनी समांतर सभा घेत शशिकांत पाटील-चुयेकर यांची अध्यक्षपदी निवड केली होती.

समविचारी आघाडीने न्यायालयात याचिका दाखल करून १३ संचालकांच्या बहुमताच्या आधारे झालेल्या निवडीला मान्यता देण्याची मागणी केली. सुनावणीदरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या •➤पान २ वर

रेवस पोर्टस् कंपनीकडून शर्तभंग!

■ बाधित शेतकऱ्यांच्या जमिनी मूळ मालकांना परत करा

■ रायगड जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीची मागणी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

प्रकल्प उभारणीच्या गोंडस नावाखाली शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टर जमिनी ताब्यात घ्यायच्या, शासनाच्या सवलतींचा लाभ उठवायचा आणि पंधरा वर्षे उलटूनही प्रकल्पाच्या ठिकाणी साधी वीटही रचायची नाही, असा प्रकार अलिबाग तालुक्यातील खारेपाट परिसरात घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. फोफेरी आणि मांडवखार परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊनही निर्धारित मुदतीत प्रकल्प उभारण्यात रेवस पोर्टस् कंपनी अपयशी ठरल्याने कंपनीने शासकीय परवानगीतील अटींचा उघड शर्तभंग केला आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांच्या जमिनी मूळ मालकांना परत कराव्यात, अशी आक्रमक मागणी रायगड जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीचे अध्यक्ष ॲड. प्रथमेश पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यातील खारेपाट परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणात भातशेतीचा व्यवसाय करतात. पर्यायी व्यवसाय म्हणून तलाव उभारून मत्स्यपालनाकडेही शेतकरी लक्ष देत आहेत. मात्र, खारलँड विभागाकडून बंधारे योग्य पद्धतीने बांधले जात नसल्याने या भागातील पिकत्या •➤पान २ वर

> फोफेरीपासून पेढांबे, नवखार, मानकुळे आदी भागांतील जमिनी प्रकल्पाच्या नावाखाली संपादित करण्यात आल्या आहेत. फोफेरी ते मांडवखार या परिसरातील दोनशेहून अधिक शेतकऱ्यांच्या जमिनी रेवस पोर्टस् प्रकल्पासाठी घेण्यात आल्या. मात्र, कंपनीकडून अटींचे पालन करण्यात आलेले नाही. त्यामुळे कंपनीने शर्तभंग केला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात, यासाठी हा लढा सुरू केला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.
> – ॲड. प्रथमेश पाटील, अध्यक्ष, रायगड जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समिती

पवारांची तब्येत बिघडली

■ पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल

| पुणे | प्रतिनिधी |

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्याने सोमवारी (दि. २) पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या वैद्यकीय चाचण्या सुरू असून, सध्या त्यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर असल्याची माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावरील एक्स पोस्टद्वारे दिली आहे. दरम्यान, प्रकृतीच्या कारणास्तव शरद पवार यांचा नियोजित दुष्काळी पाहणी दौरा स्थगित करण्यात आला आहे.



शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची वैद्यकीय तपासणी सुरू असून, सर्व आरोग्यविषयक निकष स्थिर असल्याचे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले. सततचे दौरे आणि कामाचा व्याप लक्षात घेता डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला आहे.

सुप्रिया सुळे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे की, बाबांना खोकल्याचा त्रास जाणवल्यामुळे पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्या वैद्यकीय चाचण्या सुरू असून, सर्व आरोग्यविषयक निकष स्थिर आहेत. सर्वांच्या •➤पान २ वर

प्रियांशी पाटीलची आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची लयलूट | **१४ वर्षीय विंडसर्फिंगपटू डकारमध्ये करणार भारताचे प्रतिनिधित्व**

उरणची लेक निघाली युवा ऑलिम्पिकला!

| चिरनेर | प्रतिनिधी |

समुद्राच्या लाटांवर स्वार होत जिद्द, मेहनत आणि कर्तृत्वाच्या जोरावर उरणच्या एका १४ वर्षीय लेकीने थेट युवा ऑलिम्पिकपर्यंत मजल मारली आहे. उरणमधील केगाव-दांडा येथील प्रियांशी मयूर पाटील ही दक्षिण आफ्रिकेतील सेनेगलमधील डकार येथे दि. ८ ते १२ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या युवा ऑलिम्पिक स्पर्धेत विंडसर्फिंग प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. अत्यंत कमी वयात आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटविणाऱ्या प्रियांशीच्या या यशामुळे रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ऑलिम्पिक स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी सोमवारी (दि. २) प्रियांशीने आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी घरत यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचे अभिनंदन केले आणि युवा ऑलिम्पिकसाठी शुभेच्छा दिल्या. प्रियांशीच्या जिद्दीचे कौतुक करताना ती समुद्राच्या लाटांसोबत सहज खेळते. ती रायगडवासियांचा अभिमान असून, भारतासाठी पदक जिंकून आणेल, असा विश्वास महेंद्र घरत यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रियांशीने आपल्या यशामागे आई-वडिलांसह महेंद्र घरत यांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. त्यांनी मला नेहमी प्रोत्साहन दिले. स्पर्धा आणि प्रशिक्षणासाठी आवश्यक असताना महेंद्र घरत यांनी आर्थिक मदतीचा हात दिला. त्यांनी मला कधीही रिकाम्या हाताने पाठवले नाही. त्यांचे ऋण आयुष्यभर विसरणार नाही, अशा भावना •➤पान २ वर



परिस्थितीवर मात करत यशाला गवसणी

प्रियांशी उरण-बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये नववीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रशिक्षकाविना तिने स्वतःच्या जिद्दीवर आणि मेहनतीवर हे यश संपादन केले आहे. उरणच्या या लेकीकडून देशाला पदकाची अपेक्षा आहे. तिच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

अवकाळीने बळीराजाच्या तोंडचा घास हिरावला

| रोहा | प्रतिनिधी |

आधी पावसाने फिरवलेली पाठ आणि आता ऐन भातकापणीच्या हंगामात अवकाळी पावसाने घातलेला धुमाकूळ आहे. सोमवारी मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत सलगतीन तास झालेल्या मुसळधार पावसाने रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. शेतात कापून ठेवलेली भातशेती पूर्णपणे भिजून गेल्याने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास नियतीने हिरावून घेतला आहे. या संकटामुळे बळीराजा अक्षरशः हवालदिल झाला आहे.

ऑगस्ट महिन्यापासून पावसाने पाठ फिरवल्याने सारेजण उकाड्याने हैराण झाले होते. पाऊस अचानक गायब झाल्याने रायगडकरांवर जणुकाही जलसंकट कोसळल्याचे चित्र सर्वत्र होते. •➤पान २ वर



पुढील पाच दिवस पावसाचा इशारा

मुंबई : दिवाळीच्या उत्साहावर अवकाळी पावसाचे सावट निर्माण झाले आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असून, ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांसह दिवाळीनिमित्त खरेदी-विक्री करणारे व्यापारी आणि व्यावसायिक चिंतेत आले आहेत. पश्चिम बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या नव्या हवामान प्रणालीमुळे राज्यात पावसाळी वातावरण तयार झाले आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह राज्यातील अन्य काही जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः वादळी वाऱ्यांसह पाऊस होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

धमक्यांच्या ई–मेलने रायगड अलर्ट

विविध कक्ष, प्रवेशद्वारे, पार्किंग तसेच परिसरातील प्रत्येक भागाची सखोल तपासणी करण्यात आली. जिल्हा न्यायालयात दररोज न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी, पक्षकार आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे अशा धमक्यांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही हलगर्जीपणा न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, न्यायालयात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाची तपासणी केली जाणार आहे. तसेच जिल्ह्यातील अन्य न्यायालयांमधील सुरक्षाही अधिक कडक करण्यात येणार असल्याची माहिती अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी दिली. राज्यातील न्यायालयांना धमकीचे ई-मेल पाठविण्यामागे नेमके कोण आहे, याचा शोध सायबर पोलीस घेत आहेत. या प्रकारामुळे न्यायालयांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, रायगडमध्येही पोलीस यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाली आहे.

शेकापच्या संघर्षाला सोशल मीडियाची साथ

ॲड. साम्या कोरडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पुरोगामी युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवा पाटील, रायगड जिल्हा सोशल मीडिया प्रमुख संदीप दिघोडकर, माजी नगरसेविका संजना कीर, अलिबाग तालुका सोशल मीडिया प्रमुख प्रकाश म्हात्रे, अलिबाग तालुका पुरोगामी युवक संघटना प्रमुख विक्रांत वार्डे, अलिबाग तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, दीपक पाटील, अमोल नाईक व अन्य मान्यवर उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी आचार्य सोशल मीडिया मार्केटिंग टीमने मेहनत घेतली. यावेळी रायगड जिल्ह्यासह कोल्हापूर, सोलापूर, पुणे आदी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. पारंपरिक राजकीय संघर्षासोबतच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेशी थेट संवाद साधणे, तरुण पिढीपर्यंत पक्षाचे विचार पोहोचविणे आणि डिजिटल व्यासपीठावर पक्षाची संघटनात्मक ताकद निर्माण करणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. रस्त्यावरचा संघर्ष आणि डिजिटल माध्यमांवरील लढा यांची सांगड घालत शेकापने आधुनिक काळातील राजकीय संवादाचे नवे पर्व सुरू करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

रेवस पोर्टस् कंपनीकडून शर्तभंग!

जमिनी नापीक होण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत रेवस पोर्टस् लिमिटेड कंपनीच्या प्रकल्पासाठी सुमारे पंधरा वर्षांपूर्वी फोफेरी आणि मांडवखार परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि भूमिपुत्रांना पर्यायी रोजगार उपलब्ध होईल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी तुटपुंज्या मोबदल्यात आपल्या जमिनी दिल्या. या प्रकल्पासाठी फोफेरी ते मांडवखार परिसरातील सुमारे दोनशे हेक्टर जमिनी संपादित करण्यात आल्या. पाच वर्षांच्या आत प्रकल्प उभारला नाही, तर जमीन खरेदी रद्द मानली जाईल आणि शेतकऱ्यांना आपल्या जमिनी परत मिळविण्याचा अधिकार राहील, अशी अट जमीन व्यवहारात घालण्यात आली होती. मात्र, पंधरा वर्षांचा कालावधी उलटूनही संपादित जमिनींवर प्रकल्पाची कोणतीही ठोस उभारणी झालेली नाही. कंपनीने शासनाच्या सवलतींचा लाभ घेत भूमिपुत्रांची फसवणूक केल्याचा आरोप समितीने केला आहे.

विशेष म्हणजे, संबंधित जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर रेवस पोर्टस् कंपनीचे नाव नोंदविण्यात आले आहे. भविष्यात विरार–अलिबाग कॉरिडॉर अथवा अन्य शासकीय प्रकल्पांसाठी या जमिनी संपादित झाल्यास मूळ शेतकरी कोट्यवधी रुपयांच्या नुकसानभरपाईपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे जमीन व्यवहारातील शर्तभंगाची सखोल चौकशी करून रेवस पोर्टस् लिमिटेड कंपनीच्या नावे झालेली जमीन खरेदी तातडीने रद्दबातल करावी, कंपनीचे नाव सातबारा उताऱ्यावरून कमी करून मूळ शेतकरी खातेदारांची नावे पुन्हा नोंदवावीत, अशी मागणी ॲड. प्रथमेश पाटील यांनी केली आहे.

पवारांची तब्येत बिघडली

काळजीबद्दल आणि शुभेच्छांबद्दल त्यांनी आभारही मानले आहेत. दरम्यान, बारामती तसेच पुणे जिल्ह्यातील पावसाची परिस्थिती लक्षात घेता शरद पवार यांचा नियोजित दुष्काळी पाहणी दौरा स्थगित करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत काळजी करण्याचे कारण नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे.

पत्नीसह मुलीची हत्या करणाऱ्याला जन्मठेप

येथे पत्नीचा गळा आवळून खून केला. हा प्रकार अपघाती मृत्यू असल्याचे भासविण्याचा त्याने प्रयत्न केला. मात्र, या घटनेची साक्ष मुलगी देऊ शकते, या भीतीने त्याने तिचाही गळा आवळून खून केला. त्यानंतर मुलीचा मृतदेह उरण परिसरातील निर्जन ठिकाणी फेकून तो फरार झाला. पोलिसांनी तपासादरम्यान आरोपीचा शोध घेतला असता तो गोव्यात असल्याची माहिती मिळाली. तेथे त्याने श्रीपाल यादव या नावाने ओळख बदलून हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम सुरू केले होते. पोलिसांनी पर्यटकांच्या वेशात गोव्यात जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याला अटक केली. या प्रकरणात न्यायालयाने भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप आणि ५० हजार रुपये दंड, कलम २०१ अंतर्गत सात वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंड, तर कलम ४७१ अंतर्गत दोन वर्षांची शिक्षा आणि दोन हजार रुपये दंड सुनावला. दंडाच्या रकमेतून ५० हजार रुपये फिर्यादीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील यशवंत भोपे आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अंकुश कदम यांनी बाजू मांडली. तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश दिवेळी यांनी तपास केला. न्यायालयीन कामकाजात कोर्ट पैरवी अधिकारी रसिका राठोड यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

महेंद्र थोरवे टोरंटच्या दावणीला?

कोणत्याही अधिकृत पुराव्याशिवाय जंगलात दरवर्षी एक लाख झाडे तोडली जातात, असे वक्तव्य करून थोरवे विरोधकांवर टोलेबाजी करतात. दुसरीकडे तीन लाख झाडे तोडली जाण्याची शक्यता असलेल्या टोरंट प्रकल्पाचे उघडपणे समर्थन करतात. हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारने सर्व नियम पाळून मंजूर केला आहे. हा ग्रीन एनर्जी प्रकल्प असून, यातून आदिवासी युवकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प झालाच पाहिजे, अशी भूमिका आमदार महेंद्र थोरवे यांनी मांडली आहे.

प्रसिद्धीसाठी तटकरे आणि घारेंच्या नावाचा जप?

खासदार सुनील तटकरे आणि सुधाकर घारे यांचे नाव घेतल्याशिवाय महेंद्र थोरवेंचा दिवस जात नाही. आमचे नाव घेऊन त्यांना प्रसिद्धी मिळते. त्यामुळे प्रसिद्धीसाठी ते सतत तटकरे आणि घारे या दोन नावांचा जप करत असतात, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुधाकर घारे यांनी केले.

गोकुळमध्ये महायुतीची कोंडी

कार्यपद्धतीवर आक्षेप घेण्यात आले. निश्चित तारीख न देता सभा तहकूब करण्याच्या निर्णयावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया घेण्याचे निर्देश दिले. तसेच सर्व २५ संचालकांना २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत नोटीस बजावण्याचे आदेश दिले.

२९ ऑक्टोबरच्या सभेला महायुतीचे १२ संचालक अनुपस्थित राहिल्याने अध्यक्ष निवडीची प्रक्रिया रखडली होती. आता १० नोव्हेंबरच्या सभेत या संचालकांची भूमिका काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. महायुतीचे संचालक सभेला उपस्थित राहणार की पुन्हा अनुपस्थित राहणार? समांतर सभेत झालेल्या निवडीबाबत पुढे काय निर्णय होणार? तसेच १० नोव्हेंबरला निवडणूक प्रक्रिया नेमकी कशी पार पडणार? या प्रश्नांची उत्तरे अद्याप गुलदस्त्यात आहेत. गोकुळच्या सत्तासंघर्षात १३ विरुद्ध १२ असे संख्याबळ असताना आता न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामुळे १० नोव्हेंबरची सभा महायुती आणि समविचारी आघाडी या दोघांसाठीही महत्त्वाची ठरणार आहे.

उरणची लेक निघाली युवा ऑलिम्पिकला!

तिने व्यक्त केल्या.प्रियांशीने २०२५ मधील सिंगापूर इंटरनॅशनल ओपन विंडसर्फिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकावले आहे. ती २०२५ आणि २०२६ मधील दुहेरी आशियाई पदकविजेती असून, गेल्या वर्षभरात तिने १५ राष्ट्रीय आणि तीन आंतरराष्ट्रीय पदकांची कमाई केली आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये थायलंड येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतही तिने उल्लेखनीय कामगिरी केली. जुलै २०२६ मधील युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये सहभाग घेतल्यानंतर ४ ते ८ ऑगस्टदरम्यान मलेशियात झालेल्या आशियाई चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकावले. ती राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती असून, २०२६ च्या विंडसर्फिंग विश्व अजिंक्यपद स्पर्धेतही तिने पहिल्या दहामध्ये स्थान मिळवले आहे.

परिस्थितीवर मात करत यशाला गवसणी

देश–विदेशातील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा खर्च पालकांना पेलणे कठीण जाते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी वेळोवेळी आर्थिक मदत करून तिच्या स्वप्नांना बळ दिले आहे. आता युवा ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज झालेल्या या उरणच्या लेकीकडून देशाला पदकाची अपेक्षा आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांना खालील वर्णनाची मिळकत कायम खुश खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित, बिनजोखमीची असल्याचा भरवसा आमचे अशिलांस जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश भिकमचंद जैन व श्री. जयंतीलाल प्रतापमल जैन यांनी दिला आहे. याकरिता सदर मिळकतीबाबत हरकतींची खातरजमा करण्याकामी सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांचे सांगणेवरून त्यांचे वतीने देत आहे.

मौजे बाहेरशिव, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

अ.क्र	गट.क्र	क्षेत्र (हे.आर)	आकार	प्रकार	अ.क्र	गट.क्र	क्षेत्र (हे.आर)	आकार	प्रकार
१	१०	००.५६.००	०.६२	भातशेती	६	२५	००.२८.००	०.५०	भातशेती
२	१९	००.१८.००	०.३१	भातशेती	७	४१	००.२२.००	०.३७	भातशेती
३	२१	००.२०.००	०.३१	भातशेती	८	४३	००.६१.७०	०.६३	भातशेती
४	२३	००.३९.००	०.६६	भातशेती	९	६८	००.०६.००	०.११	भातशेती
५	२४	००.३७.००	०.६४	भातशेती					

येणे प्रमाणे उल्लेखित मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, विक्री, तारण, गहाण, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ०३/११/२०२६

(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)
मु.पो सुप्रीम कॉलनी नागोठणे, ता.रोहा, जि.रायगड
मो.नं ९७६७२५०११०

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

Sr. No.	Tender / Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No:-** EE/EHV (O &M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-17/2026-27 Dtd. 03.11.2026 **RFx No. – 7000041835**	**Sub.:** SRM E-Tender for Annual Maintenance Contract of Computers at Line Maintenance Sub Division Mahad, Division Office Mahad & 220 kV Mahad S/s, 220 kV K'gaon S/s, 220 kV Vilebhagad S/s, 100 kV Roha S/s & 100 kV Mhasala S/s for the year 2026–27.	Rs.5,00,000/- (including GST + 1% Labour CESS)

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from **03.11.2026 @ 00:00 hrs to 12.11.2026 @23:59 Hrs** for above tender

For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in.**

Contact Person:- The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd-
Executive Engineer
EHV(O&M) Dn. Mahad

भारत सरकार, रेल्वे मंत्रालय

रेल्वे भरती मंडळे (RRBs)

केंद्रीकृत रोजगार अधिसूचना (सीईएन) क्र. ०९/२०२६

आयसोलेटेड कॅटेगरी अंतर्गत विविध पदांसाठी भरती

संकेतात्मक सूचना

'आयसोलेटेड कॅटेगरी' अंतर्गत विविध पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. सर्व अटी पूर्ण करणारे अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने (**https://www.rrbapply.gov.in**) सादर करणे आवश्यक आहे.

अर्ज सुरू होण्याची तारीख : ०५.११.२०२६ (संभाव्य)
अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : ०४.१२.२०२६; रात्री २३:५९ वाजेपर्यंत (संभाव्य)

पदाचे नाव	7 व्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर	वैद्यकीय मानक	वयोमर्यादा (०१/०१/२०२७ रोजी)	संभाव्य रिक्त जागा (सर्व RRBs मिळून)
'आयसोलेटेड कॅटेगरी' अंतर्गत विविध पदे	स्तर-2 ते स्तर-7	सविस्तर CEN मध्ये नमूद केल्याप्रमाणे	सविस्तर CEN मध्ये नमूद केल्याप्रमाणे	१९५ (अंदाजे)

टीप: 1. उमेदवारांना सल्ला दिला जातो की, ऑनलाइन अर्ज भरताना आधार कार्डचा वापर करून आपली प्राथमिक माहिती तपासून घ्यावी. ज्या अर्जांची आधारद्वारे पडताळणी झालेली नाही, अशा अर्जांची भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सविस्तर छाननी केली जाईल, ज्यामुळे गैरसोय किंवा विलंब होऊ शकतो. **2.** आधारद्वारे यशस्वी पडताळणी होण्यासाठी, आधार कार्डवरील तुमचे पूर्ण नाव आणि जन्मतारीख ही तुमच्या १० वीच्या उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील पूर्ण नाव आणि जन्मतारखेशी तंतोतंत (१००%) जुळणे आवश्यक आहे. तसेच, ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आधार कार्डवर तुमचा अद्ययावत फोटो आणि बायोमेट्रिक्स (ठसे/फिंगरप्रिंट आणि आयरिस/डोळ्यातील बुबुळाचे ठसे) अपडेट केलेले असावेत. **3.** ही सूचना केवळ 'संकेतात्मक' स्वरूपाची आहे. भविष्यात येणाऱ्या सविस्तर CEN (केंद्रीकृत रोजगार अधिसूचना) बद्दल उमेदवारांना माहिती मिळावी आणि त्यांनी अर्जासाठी आवश्यक प्रमाणपत्रे किंवा कागदपत्रे तयार ठेवावीत, या उद्देशाने ही सूचना जारी करण्यात आली आहे. हे देखील स्पष्ट करण्यात येते की, भरती प्रक्रियेचे नियम, अटी, पात्रतेचे निकष, कार्यपद्धती आणि इतर सर्व आवश्यकता पूर्णपणे सविस्तर 'CEN क्र. 09/2026' (आणि वेळोवेळी जारी केल्या जाणाऱ्या शुद्धिपत्रकांसह) नुसार असतील. हे तपशील सर्व रेल्वे भरती मंडळांच्या (RRBs) सामायिक वेबसाइटवर, म्हणजेच **https://rrb.indianrailways.gov.in** वर प्रसिद्ध केले जातील. उमेदवार या सामायिक वेबसाइटवरून संबंधित RRB च्या स्वतंत्र वेबपेजवर जाऊ शकतात.

क्रमांक: RRB/GHY/Advt./CEN/09/2026
दिनांक:०३.११.२०२६

अध्यक्ष,
रेल्वे भरती मंडळ

AK-718 **"दलाल, मध्यस्थ आणि नोकरीच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्यांपासून सावध राहा"**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे - मोहपे, तालुका-पनवेल, जिल्हा- रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल १. श्री. बाळाराम उर्फ बालाराम रघुनाथ भोईर, २. श्री. विकास रघुनाथ भोईर, ३ श्रीमती कमल सखाराम फडके आणि ४. श्रीमती निर्मला रघुनाथ भोईर, सर्व रा. मौजे मोहपे, तालुका- पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

वरीलप्रमाणे परीशिष्ट
मौजे- मोहपे, तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड

गट नं. व उपविभाग क्र	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.
२२/१	क्षेत्र ०.२१.०० पोट खराबा ०.०३.८० एकुण क्षेत्र ०.२४.८०	४.८२
एकुण खरेदी करावयाचे क्षेत्र	०.२४.८०	

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर २१ (एकविस) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/११/२०२६

KISHORA. DHAKAD
(ADVOCATE HIGH COURT)
Add-Office No.21, Muncipal Complex,
Near Vasudev Balvant Fadke
Natyagruha, At-Panvel,
Taluka-Panvel 410206
Email-kishordhakad@yahoo.co.in
Mobile No. 9867051330

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्री. सुरेश शांताराम घरत रा. जोशी शारदा गृहनिर्माण संस्था मर्या., अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काचा व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली निवासी सदनिका माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील सि.स.नं. ११५२/१, ११५२/२, ११५२/३, ११५२/४ ११५२/५ ११५२/बी ११५२/के या मिळकतीवरील बांधण्यात आलेली जोशी शारदा गृहनिर्माण संस्था मर्या., या इमारतीमधील ए विंगमधील स्टील्ट तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र. अे ००१, क्षेत्र ८५५ चौ. फूट बिल्टअप (७९.४६ चौ.मी.) (अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र.ALB000001585, जुना मालमत्ता क्र.Z1STS001587 मॅन्युअल क्र.१३२२ अ/अे विंग) ही निवासी सदनिका

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २/११/२०२६

सही /-
ॲड. विवेक संजय जोशी
रा. ओमसागर अपार्टमेंट, अे २/१०९,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ८८८८९१८१००

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल प्राजक्ता अमितकुमार कानेटकर यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. शामल प्रमोद थरवळ, २. राजेंद्र पंढरीनाथ खिसमतराव ३. अरुणा विनव जोगदेव, ४. अतुल रमेश रोडगे, ५. अमर रमेश रोडगे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा /गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कलावे.

मौजे - नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
नागाव, ता.अलिबाग	६२४/२	बागायत क्षेत्र ०-०४-७० पो.ख. ०-००-८० एकूण क्षेत्र ०-०५-५०	२.२६

वर नमुद बागायत मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नागाव हद्दीतील घर मालमत्ता क्र. ५५३ ही मिळकत.

दिनांक :- ०३/११/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३,
पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड,
मोबा. ९७६७०१०९०२

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक नईम अब्दुल लतीफ चोगले रा. कोर्लई, ता. मुरुड, जि. रायगड असलेली मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्र.व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
तळवली, ता.मुरुड	९५	एकूण ०-२५-००	०.२८

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/११/२०२६

सही/-
ॲड. मनोज ओव्हाळ
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९८८१२७७४४९

जाहिर नोटीस

मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २२१ हिस्सा नं. २ /ब, प्लॉट नं. ७, क्षेत्र ४३४ चौ.मी., आकार ८.६८ रू. पैसे या बिनशेती मिळकतीवरील ग्रामपंचायत वरसोली हद्दीतील वरदवंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विद्यानगर, या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. ८, क्षेत्र ५१५ चौ. फुट बिल्टअप (ग्रामपंचायत वरसोली घर नं. ११९३/८, क्षेत्र ४५.९१ चौ.मी. ही भगवान यशवंत शिरोशे यांचे नावे व ताबेकब्जा वहिवाटीत असलेली सदनिका विकत घेण्याची ठरविलेली आहे.

संदर्भित निवासी सदनिका मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे आशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार गहाण दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, बक्षिस ताबा, बोजा, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे आशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०२/११/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. सुरेश रामचंद्र करंजकर व इतर-३ रा. ४०१, ड्रीम हेवन, प्लॉट नं. १८, नेरुळ नोड-३ रा एस. ओ., जिल्हा ठाणे यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत व बयाणा पावती केली आहे.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, तलाठी सजा-कामार्ली, मौजे मांगरुळ येथील जमिन मिळकतीचे ७/१२ वरुन वर्णन खालील प्रमाणे--

मौजे	गट नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पैसे
मांगरुळ	१३९	०-२६-४० पो.ख. ०-२६-२० एकुण ०-५२-६०	६-१२

सदरची जमिन ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-५२-६० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. ०३/११/२०२६.

सही
ॲड. संजय भास्कर पाटील
परमार प्लाझा, शॉप नं. १६
तळ मजला. शिवाजी पथ.
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. अनिल दत्तात्रेय कडव व २. श्री. आवेश दत्तात्रेय कडव यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १. श्री. अशोक शंकर गवळी व २. श्री. सदानंद शंकर गवळी यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
२८	२	०-२५-५०	३-००
२८	४	०-१४-००	१-६९

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०३/११/२०२६.

ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०१०१.
मो.- ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. अभिजीत शत्रुघ्न शिंगोले यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे- आर-पॉ)	आकार (रू. पै)
१६३	३	२-३९-००	१-१०

वरील जमिन मिळकती मध्ये जमिन मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-७९-० हे.आर.पॉ एवढे असून त्यापैकी विकत देत असलेले क्षेत्र ०-४०-० हे. आर.पॉ

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/११/२०२६

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

निवडक



रिकाम्या जागेवर गुरांचा ठिय्या

रोहा : दिवाळीच्या अनुषंगाने रोहे शहरातील दमखाडी नाका ते तीन बत्ती नाक्यापर्यंत फटाके, आकाश कंदील इत्यादी साहित्यांची विक्री करण्यासाठी असंख्य स्टॉल लागत असतात. यंदा मात्र नगरपरिषदेन बहूमताच्या जोरावर येथील सर्व स्टॉल धारकांसाठी नदी संवर्धन गार्डन येथे व्यवस्था केली आहे. त्यामुळे बाजार पेठेतील मोकळ्या जागेवर मोकाट गुरांनी ठिय्या मांडल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी मुख्याधिकारी आणि लोकप्रतिनिधी आलिशान व वातानुकूलित कार्यालयात तासांतास बसून शहराच्या विकासासाठी चर्चा करत असतात, त्या मुख्य कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर या मोकाट गुरांची कळप दिसून येत आहे. रोहे शहरात सद्या पिसाळलेल्या कुत्र्यांप्रमाणे मोकाट गुरांची समस्या गंभीर होत चालली आहे. विशेष म्हणजे नगरपरिषद चौक परिसरात मोठ्या संख्येने मोकाट गुरे आढळून येत आहेत. ही बाजार पेठेतील मुख्य जागा असून, रहदारी आणि गर्दीचे ठिकाण आहे. कधी कधी रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकाला लागून गुरे बसत असल्याने पहाटे मॉर्निंग वॉक आणि कंपनीत पहिल्या पाळीवर जाणाऱ्या कामगारांना व शालेय विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन मार्ग काढावा लागत आहे. त्याचप्रमाणे एसटी चालकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.



घाटमाथ्यावरून मेंढपाळांचे आगमन

खांदेश्वर : नोव्हेंबर महिन्याची चाहूल लागताच घाटमाथ्यावरील मेंढपाळ कुटुंबांनी आपल्या मेंढ्या आणि शेळ्यांच्या कळपांसह पनवेल तालुक्यात दाखल होण्यास सुरुवात केली आहे. बदलत्या काळात शेतीच्या पद्धती आधुनिक होत असल्या, तरी शेती आणि पशुपालन यांच्यातील पारंपरिक नाते आजही टिकून आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगावी भटकंती करणाऱ्या या मेंढपाळ कुटुंबांचा प्रवास अनेकांसाठी कुतूहलाचा, तर त्यांच्या जगण्याची कहाणी संवेदनशील करणारी आहे. पनवेल तालुक्यात आजही अनेक शेतकरी भातशेतीसह विविध प्रकारची पिके घेतात. शेतीची कामे पूर्ण झाल्यानंतर शेतजमिनीला नैसर्गिक खत मिळावे, यासाठी शेतकरी मेंढपाळांना आपल्या शेतात काही दिवस मुक्काम करण्याची परवानगी देतात. मेंढपाळ आपल्या कुटुंबासह शेताच्या बांधावर किंवा मोकळ्या जागेत तात्पुरता डेरा टाकतात. रात्रीच्या वेळी मेंढ्या आणि शेळ्या शेतात बसवल्या जातात. त्यांच्या विष्ठेमुळे जमिनीला नैसर्गिक खत मिळते. त्यामुळे जमिनीचा कस सुधारण्यास मदत होते. अशा प्रकारे अनेक वर्षांपासून शेती आणि पशुपालन यांचा एकमेकांना पूरक असा व्यवहार सुरू आहे. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी परिसरातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूनेही सध्या मेंढपाळांचे कळप मार्गक्रमण करताना दिसत आहेत.



(छायाचित्र: संजय गायकवाड)

वृक्ष तोडीला प्रेस क्लबचा विरोध

कर्जत : टोरंट प्रकल्पासाठी सुरू असलेल्या वृक्ष तोडीस कर्जत प्रेस क्लब आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यांनी ही वृक्षतोड तात्काळ थांबविण्याबाबत कर्जत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ आणि तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना निवेदन सादर केले आहे. तसेच, हे निवेदन कंपनी प्रशासनाला आणि सरकारला पाठवावे, अशी विनंती देखील पत्रकारांतर्फे करण्यात आली आहे. या निवेदनामध्ये साईडोंगर परिसरात टोरंट कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. या वृक्षतोडीमुळे परिसरातील नैसर्गिक वनसंपदा, जैवविविधता, पर्यावरणीय समतोल आणि स्थानिक निसर्गसंपत्तीला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. साईडोंगर परिसराचे पर्यावरणीय महत्त्व लक्षात घेता, येथील वृक्षतोड हा केवळ स्थानिक प्रश्न नसून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत चिंतेचा विषय आहे. असे अनेक मुद्दे या निवेदनात नमुद करण्यात आलले आहेत. यावेळी रायगड प्रेस क्लब कार्याध्यक्ष संजय मोहिते, सचिव दर्वेश पालकर, अध्यक्ष गणेश पवार, विजय मांडे, संजय गायकवाड, विद्यानंद ओव्हाळ, संतोष दळवी, जयवंत हाबळे, दीपक पाटील, अजय गायकवाड, मल्हार पवार, मोतीराम पादिर, अनिल गवळे, संजय अभंगे, गणेश पुरवंत, विलास श्रीखंडे, ज्ञानेश्वर बागडे आदी उपस्थित होते.

श्रीवर्धन नगरपरिषदेचा संतापजनक कारभार

- दुष्काळग्रस्त पालिकेकडून तारंगणावर निधीची उधळपट्टी
- नगरसेवक प्रणिल बोरकर, सुप्रिया चोगले यांचा आरोप

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

एकिकडे संपूर्ण श्रीवर्धन तालुका अधिकृतपणे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाला असून, संपूर्ण तालुक्यात तीव्र पाणीटंचाईचे सावट पसरले आहे. असे असताना, श्रीवर्धन नगरपरिषदेचा संतापजनक आणि बेजबाबदार कारभार चव्हाट्यावर आला आहे. दुष्काळाच्या या भीषण काळात नागरिकांना पाणी पुरवण्याऐवजी, परिषदेने थेट समुद्राकाठी तारंगण उभारणीसाठी लाखो-करोडोंचा निधी वळवून जनतेच्या रोषाला आमंत्रण दिले आहे. त्यामुळे नगरसेवक प्रणिल बोरकर आणि नगरसेविका सुप्रिया चोगले यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना थेट धडक निवेदन देऊन प्रशासनाला पिंजऱ्यात उभे केले आहे.

संपूर्ण श्रीवर्धन तालुका दुष्काळात होरपळत असताना आणि पाण्याची तीव्र टंचाई असताना, पिण्याच्या पाण्याच्या योजनांना बगल देऊन समुद्रकिनारी नगरपरिषदेच्यावतीने तारांगण बांधले जात आहे. त्यामुळे दुष्काळाच्या या भीषण काळात नागरिकांना पाणी पुरवण्याऐवजी, परिषदेने थेट समुद्राकाठी तारंगण उभारणीसाठी लाखो-करोडोंचा निधी वळवून जनतेच्या रोषाला आमंत्रण दिले आहे. त्यामुळे नगरसेवक प्रणिल बोरकर आणि सुप्रिया चोगले यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रश्नांचा भडीमार केला आहे. त्यात त्यांनी तारंगण उभारण्यासाठी निधी कुणाच्या आदेशाने आणि कोणत्या अधिकाराखाली मंजूर करण्यात आला? तारांगणासाठी जी उपकरणे आणि साहित्य खरेदी करण्यात आली आहेत, त्याचा अधिकृत दरपत्रक काय? या खरेदीत जनतेच्या पैशांची लूट झाली आहे का? तसेच, खरेदी केलेल्या उपकरणांची गुणवत्ता खरोखर तपासली गेली आहे का, की निकृष्ट दर्जाचे साहित्य महागड्या दरात दाखवून मोठा आर्थिक घोटाळा दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे? एकिकडे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी पाण्याच्या थेंबासाठी हवालदिल झाले आहेत, आणि दुसरीकडे पालिका प्रशासन मौजमजेच्या प्रकल्पांवर जनतेचा पैसा उधळत आहे. हा सर्वसामान्य श्रीवर्धनकरांवर झालेला अक्षम्य अन्याय आहे, असा घणाघाती आरोप नगरसेवक प्रणिल बोरकर व सुप्रिया चोगले यांनी केला आहे.

जर पालिका प्रशासनाने या सर्व खरेदीची पारदर्शक माहिती तातडीने जाहीर केली नाही आणि पाणीटंचाईच्या निवारणाला प्राधान्य दिले नाही, तर श्रीवर्धन नगरपरिषदेवर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा सज्जड इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आता यावर नगरपरिषद प्रशासन काय स्पष्टीकरण देते, याकडे संपूर्ण तालुक्यासह रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, रायगड तालुक्यातील एकमेव श्रीवर्धन तालुक्याला शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर केले आहे. परंतु, याठिकाणी नळपाणी योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. परंतु, या कामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे येथील जलवाहिनी सातत्याने फुटण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून, निकृष्ट दर्जाच्या कामावर पडदा टाकण्यासाठी तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करण्यात आल्याचे देखील स्थानिकांमधून बोलले जात आहे.



प्रशासकीय अनास्थेमुळे दुष्काळ

श्रीवर्धन शहरासाठी नळपाणी योजनेकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाला आहे. परंतु, प्रत्यक्षात सातत्याने फुटणारी आणि अत्यंत निकृष्ट दर्जाची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्यातच आता तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून हा पाणीपुरवठ्यातील भ्रष्टाचाराचा मुख्य मुद्दा जाणीवपूर्वक दाबण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय बळावला आहे. प्रत्यक्षात ही पाणीटंचाई नैसर्गिक नसून, संपूर्णपणे मानवनिर्मित आणि प्रशासकीय अनास्थेमुळे निर्माण झालेली आहे, असा घणाघाती आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

बॉक्साइड उत्खनन कधी थांबणार?



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

- तालुक्यात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड
- वायनाड सारखे भूस्खलन होण्याची भीती

कर्जत तालुक्यातील सायडोंगर या ठिकाणी टोरन्ट विद्युत प्रकल्प उभारण्यासाठी जंगलतोड सुरू करण्यात आली होती. या जंगलतोडी विरोधात सत्ताधारी सोडले तर अख्खा महाराष्ट्र एकवटला असून, सर्व पक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, निसर्गप्रेमी आणि जनता या प्रकल्पाला कडाडून विरोध करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर श्रीवर्धन तालुक्यात ब्लास्टिंक करून अनधिकृत बॉक्साइडच्या उत्खननासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड केली जात आहे. त्यामुळे याकडे सर्वांचे लक्ष कधी जाणार, असा प्रश्न स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

साधारण २००१ पासून श्रीवर्धन तालुक्यात बॉक्साइड उत्खननाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. बॉक्साइड उत्खनन करण्यासाठी शासकीय परवानगी घेताना काही ठराविक ब्रासची रक्कम शासनाला अदा करायची व त्या बदल्यात हजारो ब्रास बॉक्साइडचे उत्खनन करायचे, हा धंदा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होता. २०१४ साली सत्तेत भाजपचे सरकार आल्यानंतर या बॉक्साइट उत्खननाला काही काळ ब्रेक मिळाला. परंतु, मागील सात ते आठ वर्षांपासून बॉक्साइड उत्खनन पूर्वीपेक्षा दुप्पट प्रमणात वाढले आहे. तसेच, ज्या ठिकाणी वृक्षतोड करून बॉक्साइड उत्खनन केले गेले, त्या ठिकाणी पडलेला खड्डा बुजवून वृक्ष लागवड करवी, असा नियम असतानाही अद्यापपर्यंत त्या ठिकाणी संबंधित कंपनीने कोणतीही वृक्ष लागवड केलेली नाही. त्यामुळे तालुक्यात अतिवृष्टी झाल्यानंतर वायनाड-केरळ सारखे भूस्खलन होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या श्रीवर्धन तालुक्यातील वडघर या ठिकाणी हजारो ब्रास उत्खनन केलेले बॉक्साइड डम्प करून ठेवण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे माणगाव तालुक्यातील चांदोरे या ठिकाणी देखील खूप मोठ्या प्रमाणात बॉक्साइट डम्प करून ठेवण्यात आलेले आहे. दरम्यान, रायगडचा प्रादेशिक परिवहन विभाग स्थानिक वाहनांवरती नेहमीच कारवाई करताना आढळून येतो. परंतु, वडघर व चांदोरे या ठिकाणी परराज्यातील क्षमतेपेक्षा जास्त बॉक्सआईड वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कोणतीही कारवाई केली जात नाही. उलट प्रादेशिक परिवहन विभागाकडून आर्थिक तडजोड करून कर्नाटक राज्यातील वाहतूकदारांना नेहमीच अभय देण्याचा प्रकार सुरू असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अनधिकृतपणे सुरू असलेल्या बॉक्साइड उत्खननाबाबत तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील सामान्य जनतेमधून केली जात आहे .

मढाली येथून डोजर चोरीला

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील मढाली गावातील कुंडलिका उजव्या कालव्याच्या शेजारी उभा ठेवलेला शासकीय डोजर चोरीला गेल्याची घटन घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पाटबंधारे खात्याचा अंदाजे १ लाख २५ हजार रुपये किंमतीचा पीवळ्या रंगाचा शासकीय सयंत्र शांतुई डोजर गेल्या ५ वर्षांपासून बंद अवस्थेत होता. तो कोणीतरी चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, अधिक तपास पोसई एस.जी. भोजकर करीत आहेत.

कुंभारवाड्यात लगबग



। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

येत्या ५ नोव्हेंबरपासून दीवाळी सणाला सुरुवात होत असून, ८ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजनाचा मुख्य दिवस साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर पनवेलमधील कुंभारवाड्यात लक्ष्मीच्या मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे.

लक्ष्मीपूजनासाठी आकर्षक आणि सुबक मूर्ती घडविण्याचे काम कुंभार कलाकारांनी हाती घेतले आहे. पारंपरिक पद्धतीने मातीच्या मूर्ती तयार करण्यापासून ते त्यांना रंगरंगोटी करून आकर्षक रूप देण्यापर्यंतची कामे सध्या वेगाने सुरू आहेत. लक्ष्मीमातेच्या विविध आकारांतील मूर्तींना ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. काही मूर्तींना आकर्षक वस्त्रालंकार, मुकुट आणि दागिन्यांनी सजविण्यात येत आहे. तर, काही मूर्तींमध्ये पारंपरिक कलाकुसरीला प्राधान्य दिले जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही लक्ष्मीपूजनासाठी मूर्ती खरेदी करण्याकरिता नागरिकांची पावले कुंभारवाड्याकडे वळणार आहेत. त्यामुळे कुंभार कलाकारांनी वेळेत मूर्तींचे काम पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत सुरू केली आहे.

विविध पणत्यांचे आकर्षण

- अलिबाग बाजारपेठेत दिवाळीसाठी आकर्षक विद्युत रोषणाई, पणत्या आणि झुंबर दाखल.



(छायाचित्र : समीर मालोदे)

श्रमदानातून बांधला बंधारा



। चणेरा । प्रतिनिधी ।

पावसाच्या कमी प्रमाणाचा सर्वांनीच धसका घेतला असून, वन आणि कृषी विभाग सतर्क झाले आहेत. त्यांच्याकडून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' म्हणत बंधारे बांधण्यासाठीचा जन जागृती होत आहे. रोहा तालुक्यातील ठिकठिकाणी बंधारे बांधले जात असतानाच घनदाट जंगल असणाऱ्या निवी येथील नैसर्गिक ओहळवर रविवारी (दि.१) बंधारा बांधण्यात आला. वनपाल प्रवीण शिंदे, माजी सरपंच अमित मोहिते यांच्या पुढाकारातून तरुणांनी एकजुटीने बांधारा बांधल्याने संपूर्ण तालुक्यात कौतुकाचा विषय ठरला आहे. दरम्यान, पुढील आठवड्यात निवीकर महिला, पुरुष, तरुण यांच्या श्रमदानातून दोन-तीन बंधारे बांधण्यात येणार असल्याची घोषणा माजी सरपंच अमित मोहिते यांनी केली. प्रत्येक घरातील व्यक्तीचा सहभाग असेल, वन विभाग, कृषी विभाग अधिकारी, कर्मचारी सामाजिक संस्थाही सहभागी होतील. यावेळी वनभोजन करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती मोहिते यांनी दिली.

रोह्यात काँगेसचे आंदोलन

। रोहा । प्रतिनिधी ।

दिल्ली येथे रविवारी (दि.१) इंडिया आघाडीच्यावतीने 'वोट बचाओ, देश बचाओ' महारॅलीचे आयोजन विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. या आंदोलनात सहभागी झालेले रोहा तालुकाध्यक्ष मितेश कल्याणी यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी रोह्यातील एसटी स्थानक परिसरात आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाच्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवर आक्षेप नोंदवण्यात आला. तसेच, जाणिवपूर्वक मतदार यादीतून पात्र मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप करण्यात येत असून, या प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत पक्षाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष अशफाक पानसरे, सरचिटणीस सुनील देशमुख, खजिनदार रामप्रकाश कुशवाह, अल्पसंख्याक सेल कार्याध्यक्ष फैसल अधिकारी, सगीर अधिकारी, बशीर भुरे, अशोक कांबळे, हरीओम टाळकुठे, खुर्शीद अधिकारी, नावेद चौगुले, इकबाल पानसरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

। रसायनी । प्रतिनिधी ।

पत्रकारांवर दिवसेंदिवस हल्ल्यांचे प्रमाण वाढत असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. नवी मुंबई येथील महिला पत्रकार प्रिया खंडागळे यांच्याशी संबंधित मारहाणीच्या कथित घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची तातडीने गडचिरोली येथे बदली करावी, पत्रकाराची जाहीर माफी मागावी आणि गृह विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी आक्रमक मागणी त्यांनी केली आहे.



चायनीज पणत्यांकडे वाढता कल | कुंभार समाजाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर

पारंपरिक पणत्यांचा प्रकाश मंदावला

समीर रिसबूड
। श्रीवर्धन ।

दिवाळीच्या सणात प्रत्येक घराला प्रकाशमान करणारी लाल मातीची पणती आता अस्तित्वाची लढाई लढत आहे. पिढ्यानपिढ्या कुंभार समाजाच्या हातातून आकाराला येणाऱ्या या पणत्यांची जागा बाजारपेठेत आयत्या चायनीज बनावटीच्या पणत्यांनी घेतल्याने श्रीवर्धनमधील कुंभार बांधवांच्या पारंपरिक व्यवसायाला उतरती कळा लागली आहे.

श्रीवर्धन येथील कुंभारवाड्यातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह लाल मातीच्या पणत्या तयार करण्यावर अवलंबून होता. मात्र, बाजारात सहज उपलब्ध होणाऱ्या चायनीज पणत्यांमुळे हाताने बनविलेल्या मातीच्या पणत्यांची मागणी घटत चालली आहे. परिणामी, या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न कमी होत असून, तरुण पिढीही पारंपरिक व्यवसायापासून दूर जात आहे.

विशेष म्हणजे, तांबडीच्या डोंगरातील एक भाग पूर्वी कुंभार व्यावसायिकांसाठी राखीव होता. या ठिकाणाला कुंभार खाण म्हणून ओळखले जात असे. येथील लाल मातीचा वापर पणत्या तयार करण्यासाठी केला जात होता. मात्र, सध्या या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने माती आणतानाही कुंभार बांधवांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. बाजारातील स्पर्धा आणि कच्च्या मालाची अडचण अशा दुहेरी संकटात हा व्यवसाय सापडला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी सणासुदीच्या काळात या पणत्यांची खरेदी करून कारागिरांच्या कलेला हातभार लावण्याची गरज आहे. कारण, ही केवळ पणतीची खरेदी नसून, एका पारंपरिक व्यवसायाच्या अस्तित्वाला दिलेला आधार आहे.

> पूर्वी दिवाळीच्या काळात पणत्या बनविण्याचे काम रात्रंदिवस सुरू असायचे. आता बाजारात चायनीज पणत्या सहज मिळत असल्याने आमच्या हाताने बनवलेल्या पणत्यांना अपेक्षित मागणी राहिलेली नाही. या व्यवसायावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे कठीण होत आहे. ग्राहकांनी दिवाळीत तरी मातीच्या पणत्यांना पसंती दिली, तर आमची ही पारंपरिक कला टिकून राहण्यास मदत होईल.
> – रवी करंजकर, व्यवसायीक, श्रीवर्धन

सीएनजीच्या नावाखाली बायोगॅसची विक्री?

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरालगत असलेल्या एचपी पेट्रोल पंपावर सीएनजी विक्रीचे मोठमोठे फलक झळकत असताना प्रत्यक्षात मात्र बायोगॅसची विक्री होत असल्याचा गंभीर आरोप रिक्षाचालकांनी केला आहे. सीएनजीच्या नावाखाली वेगळाच गॅस मिळत असल्याने वाहनचालकांची आर्थिक लूट तर होत नाही ना, असा सवाल उपस्थित होत आहे. याठिकाणी गॅस भरल्यानंतर रिक्षांना अपेक्षित मायलेज मिळत नसून, वारंवार रिक्षा बंद पडत असल्याने चालक त्रस्त झाले आहेत. याबाबत पंप मॅनेजर नाना मुंढे यांना जाब विचारला असता, महानगर गॅसकडून सीएनजीचा पुरवठा होत नसल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकाराविरोधात संतप्त रिक्षाचालकांनी पेण तालुका पुरवठा अधिकारी तथा नायब तहसीलदार सतीश शिंदे यांच्याकडे तक्रार केली. याची दखल घेत त्यांनी चौकशी करून पंपाचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याचे आश्वासन दिले. संबंधित विभागाने केवळ आश्वासन न देता तातडीने तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी होत आहे.

रामलीला मैदानाचा इशारा

रविवारी दिल्लीत विरोधकांनी काढलेला मोर्चा आणि रामलीला मैदानावर झालेल्या विराट सभेने नरेंद्र मोदींच्या सत्तेला आणखी एक हादरा दिला आहे. ही सभा होऊ नये म्हणून भाजपने जंग जंग पछाडले. ऑक्टोबर महिन्यात जंतरमंतरवर निदर्शने करण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी दिल्लीला लष्करी छावणीचे स्वरुप आले होते. सर्व मेट्रो स्टेशन्स बंद करण्यात आली. रस्त्यावर चिटपाखरूही फिरकू नये असा प्रयत्न झाला. नंतर जंतरमंतरवर आंदोलन करता येणार नाही असा फतवा निघाला. रामलीला मैदान हे निदर्शनांसाठी दिले गेले. दिवाळीच्या उत्सवाच्या दरम्यान विरोधक तिथे आंदोलन करू धजावणार नाहीत व नंतर हा मुद्दा विरून जाईल असा भाजपचा होरा होता. पण राहुल गांधी व बाकीच्या विरोधकांनी त्यांना शह दिला. रविवारची सभा होऊ नये म्हणून भाजपवाल्यांनी दिल्लीतील व्यापाऱ्यांना पत्रक काढायला लावले. इथे आंदोलन झाले तर ऐन दिवाळीच्या तोंडावर आमचा धंदा बुडेल, अमुक हजार कोटींचे नुकसान होईल असे बजावले गेले. एरवी बोफोर्स, रामजन्मभूमीच्या निमित्ताने आणि नंतर अण्णा हजारेंच्या आंदोलनाच्या वेळी भाजपवाले दिवसचे दिवस भाजपवाले जो धुडगूस घालत होते त्यावेळी हेच व्यापारी कधीही बोलले नव्हते. त्यावेळी बहुदा या आंदोलनांचा त्यांना फायदा होत असावा. आता काँग्रेसच्या आणि कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनांना प्रतिसाद मिळू लागताच यांच्या पोटात दुखू लागले. भाजपला साप मारण्यासाठी हे व्यापारी काठी पुरवायला तयार झाले. व्यापाऱ्यांनी राहुल गांधी व नंतर सोनिया गांधी यांना पत्रे लिहून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पण काँग्रेस व इतर विरोधक बधले नाहीत. कारण त्यांच्या मागे जनता होती. जनतेची अस्वस्थता व्यक्त करणे आवश्यक आहे याची त्यांना खात्री होती. त्यामुळेच त्यांनी आपला निश्चय पूर्ण केला व विराट शक्तीप्रदर्शन केले. कालच्या सभेत समाजवादी, राजद, ममता बॅनर्जींचा तृणमूल काँग्रेस व कम्युनिस्ट असे सर्व पक्ष सहभागी झाले होते. यामुळे विरोधकांच्या ऐक्याचा झेंडा दिल्लीत फडकला व त्याने मोदी सरकारला नोटीस बजावली.

ज्ञानेश का जात नाहीत?

मतचोरीचा मुद्दा सार्वत्रिकरीत्या पेटला आहे. महाराष्ट्रातून दोन कोटी मतदारांची नावे काढली गेली. आता ही बेकायदेशीरपणे कापलेली नावे घाईघाईने पुन्हा दाखल करून घेण्यासाठी मोहिमा चालवल्या जात आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने आणखी एक मुदतवाढ दिली आहे. तिकडे कर्नाटकामध्ये सुमारे एक कोटी नावे कापली गेली आहेत. त्यातही दुसऱ्याचे नावे उडवण्यासाठी फॉर्म सात भरले गेले व त्यातून लाखो नावे उडवली गेली असे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे ही नावे कापण्यासाठी कोणतीही कारणे दिली गेलेली नाहीत. तो रकाना रिकामा आहे. असे करता येत नाही. उघडच हा सर्व बेकायदा मामला आहे. खुद्द उत्तर प्रदेशातही कहर झाला आहे. तिथे पीलिभितमध्ये दहा ते चौदा हजार नावे बेकायदा उडवली गेल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणामध्ये स्थानिक अधिकाऱ्याविरुध्द गन्हे दाखल करावे लागले व त्याला अटक करावी लागली. राज्याच्या इतर भागातूनही असेच प्रकार समोर आले आहेत. दिल्लीत खुद्द निवडणूक आयुक्त, अनेक नेते आणि अधिकारी यांची नावे कापली गेली होती. बहुतांश ठिकाणी भाजपच्या फायद्यासाठी हे चालू असल्याचा संशय आहे. नेमकी ठरवून विशिष्ट मतदारसंघातील विशिष्ट समुदायाची, म्हणजे बहुतांशी मुस्लिमांची नावे कापली जातात असा अनेक ठिकाणचा अनुभव आहे. बंगालमध्ये हेच घडले. तिथे २७ लाख मतदार यादीबाहेर गेले व मतदान करू शकले नाहीत. अशाच भानगडी करून भाजप सतत निवडणुका जिंकत आहे असे आता जनतेचे मत होऊ लागले आहे. काल राहुल गांधी यांनी तर रामलीला मैदानात तसा स्पष्ट आरोप केला. २०२४ च्या निवडणुकीत मोदी त्यांच्या वाराणसी मतदारसंघात आणि भाजप बहुतांश मतदारसंघात हरली होती, पण ज्ञानेशकुमारांच्या करामतींमुळे भाजपवाले जिंकले असा राहुल यांचा अभिप्राय आहे. निवडणूक आयोगाचे अलिकडचे निर्णय पाहता त्यावर विश्वास बसेल अशी स्थिती आहे. ज्ञानेशकुमार यांच्या अब्रूची इतकी लक्तरे गेल्या काही दिवसात निघाली आहेत की त्यांच्या जागी दुसरा एखादा स्वाभिमानी अधिकारी असता तर त्याने यापूर्वीच राजीनामा दिला असता. पण एक तर त्यांना या विरोधाची पर्वा नसावी किंवा त्यांनी राजीनामा देणे परवडणारे नसल्याने सरकार त्यांना रोखत असावे.

पुढील रणनीती

गेल्या दोन महिन्यात मतचोरी या विषयावर अनेक आंदोलने झाली. त्यांचा कळस रविवारी रामलीला मैदानात गाठला गेला. कॉकरोच जनता पार्टीचाही याबाबत वातावरण निर्माण करण्यात मोठा वाटा होता. त्यांना आंदोलने करण्यास बंदी घालण्यात आली व त्यांच्या नेत्यांना अडकवून त्यांच्याकडून आता शांततभंग करणार नाही असा जामीन लिहून घेण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना आंदोलनाचा वेगळा मार्ग पत्करावा लागेल. त्यातून ते मार्ग काढतील व यशस्वी होतील असे आजवरच्या त्यांच्या प्रवासावरून म्हणता येईल. दरम्यान या विविध गटात विखुरलेल्या विरोधकांना आता एकत्र येण्याची गरज आहे. कारण त्यांना खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. कालच विरोधकांना प्रतिशह देण्यासाठी भाजपवाल्यांनी ठिकठिकाणी लोकशाही बचाव यात्रा काढल्या. सर्वत्र मुख्यमंत्री वगैरेंना त्याचे नेतृत्व करायला लावले गेले. सोशल मिडियातही भाजपच्या भक्तांचा सुकाळ आहे. तिथेही विरोधकांना बदनाम करणे चालले आहे. विरोधक अराजक माजवत आहेत, लोकशाही संस्थांवर हल्ले करत आहेत असा भाजपचा प्रचार आहे. सामान्य जनतेतील किमान काही जण अजूनही त्याला बळी पडू शकतात. भाजपकडील पैसा, मनुष्यबळ व सत्ता राक्षसी स्वरुपाची आहे. तिचा वापर ते करणार हे उघड आहे. शिवाय आरोप करताना भाजपवाले वाट्टेल त्या थराला जातात. दुसऱ्यांनी आरोप केले तर त्यांच्या मागे इडी लावली जाते किंवा कोर्टात खटले दाखल केले जातात. काँग्रेसला चीनकडून पैसा येत असल्याचा आरोप काल मुख्यमंत्र्यांनी केला. केंद्रात अमित शहा आणि राज्यात फडणवीस स्वतः गृहमंत्री आहेत. त्यांना या चीनच्या पैशांविषयी खात्रीशीर माहिती असेल तर त्यांनी काँग्रेसवर कारवाई करायला हवी. नुसतेच बेलगाम आरोप करणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. पण फडणवीसांना याबाबत कोणीही जाब विचारणार नाही. याच रीतीने कॉकरोच व इतर विरोधकांवरही परदेशांच्या मदतीने कारस्थान रचत असल्याचा आरोप होईल. नेहा बोरा हिने बांगलादेशातील डाव्या विद्यार्थी आंदोलनाबाबत सहानुभूती व्यक्त केली तर तिला बांगलादेशाचे हस्तक ठरवले गेले. मुस्लिमांनी काहीही केले तर त्यांना पाकिस्तानचे हस्तक ठरवले जाते. विरोधकांचा विरोध प्रखर होत गेला तर याच मुद्द्यावरून खोटे खटले दाखल केले जातील अशी पुरेपूर शक्यता आहे. दुसरीकडे येत्या वर्षात उत्तर प्रदेश, पंजाब इत्यादी राज्यांच्या निवडणुका आहेत. त्यात भाजपने विजय मिळवला तर त्यांना विरोधकांवर कुरघोडी करण्याची आणखी एक संधी मिळेल. या सर्व गोष्टींचा विचार करून विरोधकांना काळजीपूर्वक आपली रणनीती आखावी लागेल.

विचार

कॉर्पोरेट अरेरावी आणि सुरक्षेचे आव्हान

माहिती तंत्रज्ञानाच्या झंझावाती युगात तंत्रज्ञानाची महाकाय साम्राज्ये जागतिक भू-राजकारणाला वेठीस धरू पाहणारी समांतर सत्ताकेंद्रे बनली आहेत. सार्वभौम सरकारांना ती आव्हान देत आहेत. जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपती एलॉन मस्क यांनी नुकताच भारताच्या नियामक आणि राजकीय व्यवस्थेवर डागलेला तोफगोळा हा एका व्यावसायिक विलंबाचा त्रागा नसून, एका वैश्विक कॉर्पोरेट दादागिरीचा टोकदार नमुना आहे.



कैलास ठोळे

एकविसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञान मानवी जीवनाला अभूतपूर्व गती आणि सुलभता देत असले, तरी या प्रगतीच्या नाण्याला एक अत्यंत चिंताजनक आणि काळी बाजूही आहे. गेल्या काही दशकांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील मोजक्या महाकाय कंपन्यांनी (ज्यांना 'बिग टेक' म्हणून ओळखले जाते) जगभरातील बाजारपेठांवर अशी काही पकड मिळवली आहे, की त्यांचे भांडवल अनेक लहान आणि मध्यम देशांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही (जीडीपी) मोठे झाले आहे. या अफाट आर्थिक आणि तांत्रिक सामर्थ्यातून निर्माण झालेला अहंकार इतका विकृत स्वरूप धारण करू लागला आहे, की या कंपन्या आता स्वतःला कोणत्याही देशाच्या कायद्यापेक्षा, संविधानापेक्षा आणि राष्ट्रीय हितांपेक्षा श्रेष्ठ समजू लागल्या आहेत. त्यांचे व्यापारी हितसंबंध पूर्ण होत नाहीत किंवा त्यांच्या मर्जीनुसार नियम वाकवले जात नाहीत, त्या देशाच्या थेट राष्ट्रीय नेतृत्वाची प्रतिमा मलीन करण्याच्या, सार्वजनिक मतप्रवाह दूषित करण्याच्या आणि प्रसंगी राजकीय व्यवस्था अस्थिर करण्याच्या कुटिल डावांना हवा देतात. लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि अगदी काही आशियाई देशांमध्येही लोकशाही सरकारांना दबावाखाली आणण्याचे आणि आपल्या नफ्यासाठी राजकीय घडामोडींवर प्रभाव पाडण्याचे खेळ यापूर्वीही खेळले गेले आहेत. एलॉन मस्क यांनी भारतासंदर्भात अलिकडेच केलेले वक्तव्य याच जुन्या आणि धोकादायक साम्राज्यवादी प्रवृत्तीची आधुनिक डिजिटल आवृत्ती आहे.

एलॉन मस्क यांनी आपल्या 'एक्स' खात्यावरून भारतावर थेट निशाणा साधताना असा सूर लावला, की त्यांच्या 'स्टारलिंक' या उपग्रह इंटरनेट कंपनीला जगातील १६५ हून अधिक देशांमध्ये परवाने मिळालेले असताना, भारताच्या सर्व नियमांचे पाच वर्षे पालन करूनही अंतिम मंजुरी का मिळत नाही? पुढे जाऊन त्यांनी थेट मुकेश अंबानींचे नाव घेत, 'भारताचे खरे बॉस अंबानीच आहेत का?' असा खोचक आणि अपमानकारक सवाल विचारला. वरवर पाहता हा प्रश्न एखाद्या वैतागलेल्या गुंतवणूकदाराचा वाटू शकतो; परंतु या विधानामागचे राजकारण, त्याची वेळ आणि त्यातील अर्धसत्य अत्यंत धूर्तपणे रचले आहे. मस्क यांनी निर्माण केलेला हा आभास वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आहे. भारतीय प्रशासनाने आधीच स्पष्ट केले आहे, की 'स्टारलिंक'ला मे २०२५ मध्येच 'सॅटेलाइट ब्रॉडबँड' सेवेसाठीचा तत्त्वतः परवाना देण्यात आला आहे. प्रश्न केवळ 'स्पेक्ट्रम'वाटपाचा आणि त्याच्याशी संबंधित अंतिम परवानग्यांचा आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा आणि संवेदनशील डेटा बाजारपेठ असलेला देश आहे. उपग्रह आधारित दळणवळण हे केवळ इंटरनेट पुरवण्याचे साधन नसून देशाच्या हवाई सीमा, सागरी सीमा आणि अंतराळ सुरक्षेशी जोडलेले संवेदनशील तंत्रज्ञान आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणुकीचे निकष, डेटाची स्थानिक पातळीवरील साठवणूक आणि गुप्तचर यंत्रणांच्या सुरक्षा अटींची पूर्तता झाल्याशिवाय 'स्पेक्ट्रम' वाटप करणे कोणत्याही जबाबदार सरकारला परवडणारे नाही. मस्क यांच्या विधानाचा दुसरा विरोधाभास म्हणजे त्यांनी मुकेश अंबानी यांच्यावर केलेला व्यक्तिगत हल्ला. मस्क यांच्या 'स्टारलिंक'ने भारतात आपली ग्राउंड स्टेशन्स आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी 'रिलायन्स जिओ' आणि 'भारती एअरटेल' या दोन्ही आघाडीच्या भारतीय दूरसंचार कंपन्यांशी भागीदारी केलेली आहे. 'रिलायन्स जिओ'चे प्रमुख अंबानी आहेत. ज्यांच्याशी व्यावसायिक करार करून भारतात पाय रोवण्याची योजना आखली जाते, त्यांच्यावरच अशा प्रकारे सार्वजनिक व्यासपीठावर चिखलफेक का केली जावी? यामागे मस्क यांची दुहेरी खेळी स्पष्टपणे दिसून येते. पहिली गोष्ट म्हणजे, मस्क यांना भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा अटींमध्ये आणि डेटा सुरक्षेच्या कठोर नियमांमध्ये स्वतःसाठी सवलती हव्या आहेत. दुसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, उपग्रह इंटरनेट आणि भविष्यातील सॅटेलाइट कम्युनिकेशन क्षेत्रात कोणतीही भारतीय कंपनी मग ती जिओ असो किंवा एअरटेल; आपल्या तोडीस तोड स्पर्धक म्हणून उभी राहू नये, याची त्यांना भीती वाटत आहे. मस्क यांना भारतात केवळ एक विक्रेता म्हणून नव्हे, तर या मोक्याच्या क्षेत्रावर एकछत्री अंमल गाजवणारा सम्राट म्हणून उतरायचे आहे. भारतीय कंपन्यांनी या क्षेत्रात पाय रोवल्यास जागतिक बाजारात मस्क यांच्या मक्तेदारीला आव्हान निर्माण होऊ शकते, हीच खरी पोटदुखी या वक्तव्यामागे लपलेली आहे. या संपूर्ण प्रकरणातील आणखी एक चिंताजनक पैलू म्हणजे या विधानाची वेळ आणि त्यावरून देशांतर्गत राजकारणात उडालेला गोंधळ.

सध्या केंद्र सरकार देशांतर्गत पातळीवर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय मुद्द्यांवरून विरोधकांच्या निशाण्यावर असताना मस्क यांनी हे वक्तव्य केले. भारतीय लोकशाहीतील अंतर्गत राजकीय संघर्षाचा फायदा घेऊन सरकारवर बाह्य दबाव आणण्याची ही अत्यंत हुशार चाल होती. दुर्दैवाने, भारताच्या अंतर्गत राजकारणातील मुत्सद्देगिरी इथे तोकडी पडताना दिसली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मस्क यांच्या या विधानावर अत्यंत घाईघाईने आणि परिणामांचा विचार न करता प्रतिक्रिया दिली. 'भारतात तुमचे स्वागत आहे एलॉन, जोपर्यंत दुसरा माणूस (अंबानी) बदलत नाही, तोपर्यंत वाट पाहा,' अशा आशयाचे भाष्य करत त्यांनी या वादात उडी घेतली. घरगुती राजकारणात सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी अशा शेरेबाजीचा वापर तात्कालिक फायदा देऊ शकतो; पण राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या पातळीवर अशी प्रतिक्रिया देशाच्या हिताला मारक ठरते. विशेष म्हणजे, 'स्टारलिंक'ने सुरुवातीला 'जिओ' आणि 'एअरटेल'शी हातमिळवणीची चर्चा सुरू केली होती, तेव्हा याच काँग्रेस पक्षाने भारताच्या डेटा सुरक्षेवर आणि उपग्रह संवादातील परकीय हस्तक्षेपावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. मग आज अचानक मस्क यांच्या पाठीशी उभे राहून स्वतःच्याच देशाच्या सुरक्षा यंत्रणांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह का उभे केले जात आहे?

इथे सत्ताधारी आणि विरोधकांनी एक मूलभूत फरक समजून घेण्याची गरज आहे. देशांतर्गत राजकारणात सरकारवर टीका करणे, त्यांच्या धोरणांवर प्रहार करणे हा विरोधकांचा लोकशाही हक्क आणि कर्तव्य आहे; परंतु देशाच्या सार्वभौमत्वाचा, धोरणात्मक स्वायत्ततेचा आणि विदेशी तंत्रज्ञान कंपन्यांच्या मनमानीचा प्रश्न येतो, तेव्हा भारताचा आवाज एकसंध राहिला पाहिजे. देशांतर्गत पातळीवर अंबानी किंवा अदानी यांच्या उद्योगसमूहांचे कथित एकाधिकार किंवा त्यांना मिळणारे कथित अनुकूल वातावरण हा अंतर्गत चर्चेचा, संसदेतील वादाचा आणि जनमताच्या परीक्षेचा विषय असू शकतो; परंतु एका परकीय तंत्रज्ञान राक्षसाला खूश करण्यासाठी आपण आपल्याच देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी घातलेल्या अटी शिथिल करायच्या का? निव्वळ विदेशी कंपनीचे मालक मस्क आहेत, म्हणून त्यांना विनाअट रान मोकळे करून द्यायचे आणि भारतीय कंपन्यांवर संशय घ्यायचा, ही कोणती राष्ट्रनीती आहे? उलटपक्षी, जागतिक पटलावर भारताचे धोरण नेहमीच स्वदेशी क्षमतांना बळ देणारे असायला हवे. कोणत्याही मोक्याच्या क्षेत्रात विदेशी कंपन्यांवरचे शत-प्रतिशत अवलंबित्व हे भविष्यातील गुलामगिरीची नांदी ठरते. आज देशाचे संपूर्ण सॅटेलाइट नेटवर्क एखाद्या परकीय कंपनीच्या हातात गेले, तर उद्या युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या संघर्षाच्या वेळी ती कंपनी भारताच्या बाजूने उभी राहील याची खात्री कोण देणार? रशिया-युक्रेन युद्धाच्या काळात 'स्टारलिंक'च्या सेवांचे नियंत्रण स्वतःच्या मर्जीनुसार चालू-बंद करून मस्क यांनी आधीच दाखवून दिले आहे, की ते स्वतःला एका राष्ट्राध्यक्षापेक्षाही मोठे लष्करी नियंत्रक समजतात.

अशा बेभरवशाच्या, लहरी आणि स्वतःच्या नफ्यालाच सर्वोच्च मानणाऱ्या उद्योगपतीच्या हातात भारताच्या सुरक्षेच्या नाड्या सोपवता येणार नाहीत. त्याम ुळेच, भारतीय कंपन्या या क्षेत्रात सक्षम होत असतील, तर राष्ट्रीय हित म्हणून त्यांना प्राधान्य मिळणे ही काळाची गरज आहे. घरगुती राजकारणात त्यावरून कितीही धुरळा उडाला तरी मस्क यांच्याकडे दुर्लक्ष करावे लागेल.

चर्चा आजची

पाणी बचतीसाठी श्रमदानाचा आधार



प्रमोद जाधव

यावर्षी पावसाने लवकरच दडी मारली. पाण्याने भरलेली तलाव, नदी, विहीरींमधील जलसाठा कमी झाला आहे.जिल्ह्यात आतापासूनच पाणी कपातीचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील पाणी टंचाईला रोखण्यासाठी ग्रामीण भागातील गावे, वाड्यां वस्त्यांमधील ग्रामस्थ एकवटले आहेत. नदी, तलावांमध्ये वनराई बंधारे बांधून भूजल पातळी वाढविण्यासाठी हातात, कुदळ फावडे, घमेल घेऊन श्रमदान करू लागले आहेत.ऑक्टोबर महिन्यात सुरु झालेल्या या मोहिमेला जिल्ह्याभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे पाणी बचतीसाठी श्रमदानाचा आधार मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या साधारणपे १६ लाख ६४ हजार इतकी आहे. जिल्ह्यात दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यामध्ये नदी, तलाव, विहीरींचा समावेश असून जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत येणारे धरणे, पाझर तलावांचादेखील समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या धरणांसह लघु पाट बंधारे विभागाअंतर्गत येणाऱ्या २८ धरणांद्वारे जिल्ह्यातील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. तसेच एमआयडीसीद्वारेही जिल्ह्यातील अनेक गावांना पाणी पुरवठा होतो. जिल्ह्यामध्ये साडेतीन हजार मि.मी पेक्षा अधिक पाऊस पडतो. यंदा जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजे २१ जूनपासून पावसाने सुरुवात केली. जूलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस सक्रीय राहिला. त्यामुळे धरणे, नदी, तलाव, पाण्याने ओसंडून वाहू लागले. यंदा पावसाने उशीरा एंट्री केली.जिल्ह्यातील धरणे, तलाव, नदया पाण्याने भरल्या.मात्र पाऊस जास्त काळ राहिला नाही. ऑगस्टनंतर पावसाने दडी मारली. त्यामुळे पावसाच्या हंगामात उन्हाळी वातावरण निर्माण झाले होते. त्याचा परिणाम भूजलपातळीवर झाला. जिल्ह्यातील धरणांसह नदी, तलावांमधून जलसाठा कमी होऊ लागला आहे.काही नद्या, तलाव कोरडे पडू लागले आहेत. त्यामुळे पाण्याचा दुष्काळ निर्माण होण्याची भिती निर्माण झाली आहे.नदी, तलावांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे.पाण्याची समस्या आगामी काळात भेडसावण्याची शक्यता वर्तविली जात आहे.नदीमधील भूजल पातळी वाढविण्यासाठी रायगड जिल्ह्यात वनराई बंधारे बांधण्याच्या उपक्रमाला जिल्ह्यातील ग्रामस्थांनी स्वयंस्फुर्तीने प्रतिसाद दिला. पाणी वाचविण्यासाठी गावांतील महिला, तरुण वर्ग, पुरुष मंडळी घरातून बाहेर पडले. गावातील ग्रामस्थ व महिलांनी हातात कुदळ, टीकाव, फावडा, घमेल आणि प्लास्टीकच्या पिशव्या घेऊन नदीमध्ये वनराई बंधारा बांधण्यास सुरुवात केली. नदीलगत असलेली माती, खडी, प्लास्टीक पिशवीमध्ये घमेलाद्वारे भरण्यात आला. माती, खडीने भरलेल्या पिशव्या बांधून श्रमदानातून वनराई बंधारा तयार करण्यात आला. पाण्याच्या दुष्काळापासून संरक्षण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. सध्याच्या ओढावलेल्या दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी रायगड जिल्ह्यात ९७४ ठिकाणी वनराई बंधारे बांधण्यात आले. यामुळे गावांमध्ये निर्माण होणारी पाण्याची समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढवणे, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे तसेच ग्रामीण भागात जलसंधारणास चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन लोकचळवळीतून वनराई बंधारे बांधले. जिल्ह्यात काही नद्यांमधील जलसाठा वाढू लागला आहे. कोरडी पडण्याच्या अवस्थेत असलेल्या नद्यांमधून पाणी वाहू लागले आहे. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे तसेच ग्रामीण भागात जलसंधारणास चालना देण्यासाठी राबविलेल्या या श्रमदानातून जलसाठा बचतीला आधार मिळाला आहे. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.आतापासून पाणी कपातीचे संकट सुरू झाले आहे. एक ते दोन दिवस आड पाणी पुरवठा केला जात आहे.त्यामुळे पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

जिल्ह्यात जलजीवन योजना राबवून कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला. मात्र आजही निम्म्या योजना अपुर्ण स्थितीत आहेत. या योजनांचे काम करणाऱ्या ठेकेदारांचे बील थकले आहे. तब्बल ३० कोटीहून अधिक रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आली आहे. मात्र अद्याप तो निधीच उपलब्ध झाला नाही. जलजीवन योजना फक्त कागदावर छान दिसली, तरी प्रत्यक्षात जीवघेणी योजना ठरत असल्याचे बोलले जात आहे. या योजनांसाठी लागणारे पाईप खरेदी करून त्याचा साठवण केली आहे. वेगवेगळ्या तालुक्याच्या ठिकाणी या पाईपांचा ढिगारा पडून आहे. त्यामुळे प्रशासनाने आगामी काळात पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जलजीवन योजना पुर्ण करून घरात पाणी पोहचविण्याचा प्रयत्न केल्यास पाण्याचा प्रश्न सुटण्याची शक्यता अनेकजण व्यक्त करीत आहेत.

लोकसंसद

कुंभमेळा : दुष्काळाच्या सावटातील सुवर्णसंधी!

राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे म्हणून कुंभमेळा रद्द करा आणि त्यावरील पैसा शेतकऱ्यांना वाटा, अशी मागणी करणे म्हणजे समस्येकडे एकांगी दृष्टिकोनातून पाहण्यासारखे आहे. कुंभमेळा ही काही सरकारने आयोजित केलेली साधी यात्रा नाही. हजारो वर्षांच्या परंपरेनुसार ठरलेल्या तिथीला लाखो भाविक एकत्र येतात. सरकारची भूमिका या गर्दीचे नियोजन आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची आहे. कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या खर्चातील मोठा हिस्सा रस्ते, पूल, उड्डाणपूल, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अन्य कायम स्वरूपी पायाभूत सुविधांवर खर्च होणार आहे. याचा लाभ कुंभमेळ्यानंतरही नाशिककरांना मिळणार आहे. त्याचबरोबर देशभरातून येणाऱ्या कोट्यवधी भाविकांमुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे. हॉटेल व्यावसायिक, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, विक्रेते, शेतमाल पुरवठादार, छोटे व्यावसायिक अशा अनेक घटकांना उत्पन्नाची संधी उपलब्ध होणार आहे. विशेषतः दुष्काळामुळे अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांतील तरुणांनी या संधीचा विचार करून तात्पुरते व्यवसाय उभारण्याचा प्रयत्न करायला हवा. दुष्काळ निवारण आणि विकासकामे या परस्परविरोधी गोष्टी नाहीत. शेतकऱ्यांना मदत झालीच पाहिजे; पण त्यासाठी रोजगार आणि आर्थिक उलाढाल निर्माण करणाऱ्या संधींना विरोध करण्याचे कारण नाही. कुंभमेळा हा दुष्काळात तेरावा महिना नसून, संकटाच्या काळात अर्थव्यवस्थेला उभारी देणारी एक मोठी संधी आहे!

– अनिकेत शेटे, पुणे

दिनविशेष

थोर स्वातंत्र्यसैनिक - अन्नपूर्णा महाराणा

अन्नपूर्णा महाराणा यांचा परिचय आजही आपल्याकडे फारसा कुणाला नाही. महाराष्ट्रात तर जवळपास नाहीच. त्या एक थोर स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक होत्या. आयुष्यभर त्या गांधीवादी विचार आणि तत्त्वांचे पालन करत राहिल्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्या सामाजिक जीवनात सक्रिय होत्या. समाजातील महिला, बालके, आदिवासी समाजासाठी त्यांनी जे कार्य केले त्यातून त्या आजही स्मरणात आहेत. अन्नपूर्णा महाराणा यांचे जीवन हे निःस्वार्थ भावनेने समर्पण आणि देशभक्ती यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

३ नोव्हेंबर १९१७ रोजी नवकृष्ण चौधरी कुटुंबात जन्म झालेल्या अन्नपूर्णा यांचे वडील गोपबंधू चौधरी हे ब्रिटिश सरकारमध्ये मॅजिस्ट्रेट होते. समाजात मानमरातब, पैसा सर्वकाही होते. परंतु महात्मा गांधींच्या संपर्कात गोपबंधू आले नि चित्रच पालटले. गांधीजींच्या आवाहनावरून त्यांनी ब्रिटिश सरकारची नोकरी सोडली आणि स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. आपल्या वडिलांच्या कृतीने प्रभावित झालेली अन्नपूर्णाही मग मागे राहिली नाही. अगदी लहान वयातच तिने स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यायला सुरुवात केली.

वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच त्यांनी इंग्रजांविरुद्ध कारवाया करायला सुरुवात केली. १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहादरम्यान त्यांनी पहिल्यांदा अटकेचा अनुभव घेतला. यादरम्यान त्या सहा महिने तुरुंगात होत्या. १९३१ मध्ये, त्या कराचीमध्ये झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बैठकीत सहभागी झाल्या.

देश स्वतंत्र झाल्यानंतरही अन्नपूर्णा सामाजिक कार्यात सक्रिय राहिल्या. महिला आणि मुलांच्या उन्नतीसाठी त्यांनी सतत काम केले. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतही त्या सहभागी झाल्या. १९६४ साली ओडिशातील राउरकेला येथे जातीय दंगल झाली, तेव्हा त्यांनी शांतता प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. ओडिशातील आदिवासी समाजासाठी, विशेषतः मुलांसाठी त्यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे.

स्वातंत्र्यानंतर, अन्नपूर्णा या जणू भारतातील महिला आणि मुलांचा आवाज बनल्या. त्यांनी ओडिशातील रायगडा जिल्ह्यात आदिवासी जमातीच्या मुलांसाठी शाळा उघडली. आणीबाणीच्या काळातही त्या सक्रिय होत्या. त्यांनी रामदेवी चौधरी यांच्या ग्रामसेवा प्रेसने प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्राच्या मदतीने सरकारच्या धोरणांचा निषेध केला. त्याचा परिणाम म्हणून सरकारने या वृत्तपत्रावर बंदी घातली. तसेच रामदेवी चौधरी आणि नबकृष्ण चौधरी, हरिकेशन महाबत, मनमोहन चौधरी, जयकृष्ण मोहंती आणि इतर उडिया नेत्यांसह अन्नपूर्णा यांना अटक करण्यात आली.

अन्नपूर्णा महाराणा हे नाव केवळ स्वतंत्र भारतातील सामाजिक कार्यापुरते मर्यादित नाही. ही अशी व्यक्ती होती जिला भावी पिढीसाठी लिखित इतिहास रचायचा होता. त्यातूनच त्या वेळात वेळ काढून नियमितपणे लेखन-वाचन करू लागल्या. त्यांनी महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांची पुस्तके ओडिया भाषेत अनुवादित केली. याशिवाय त्यांनी चंबळ डाकुंच्या आत्मसमर्पणाच्या अनुभवांवर ङ्कदास्यु हृदयरा वादाफ लिहिले. ङ्कअमृता अनुभवफ हा विनोबा भावे यांच्या विचारांवर आधारित ग्रंथ ही त्यांचीच निर्मिती. याशिवाय स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित अनुभवांवरही त्यांनी विपुल लिखाण केले.

अन्नपूर्णा यांना जीवनात अनेक सन्मान आणि पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यांना उत्कल रत्न या पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. एक अतिशय सक्रिय, समृद्ध आणि अर्थपूर्ण जीवन जगलेल्या या सेवाव्रतीने ३१ डिसेंबर २०१२ रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी शेवटचा श्वास घेतला.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ नोव्हेंबर

१) श्री.यशवंत गोविंद बोडस रामनाथ, अलिबाग, दि.३-११-१९४१

२)श्रीम.प्रतिभा प्रभाकर वडके पिंपळभाट, अलिबाग दि.३-११-१९४१

३)श्री.नारायण गजानन बापट अलिबाग दि.३-११-१९५५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

महापालिकेच्या मुख्यालयात आग

भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेच्या मुख्यालयात सोमवारी (दि.२) सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. मुख्यालयाच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या घनकचरा विभागाच्या कार्यालयातून अचानक धूर निघू लागला. काही वेळातच आगीचा धूर मुख्यालयाच्या परिसरात पसरू लागल्याने सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल होण्यापूर्वीच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कार्यालयाचा दरवाजा तोडून आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत कार्यालयातील फाईल्स, कम्प्युटर व प्रिंटर आणि दैनंदिन साफसफाई संदर्भात असलेली महत्त्वाची कागदपत्रे आणि अन्य साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते.

वृक्षारोपण मोहिमेचा फज्जा

रसायनीतील सेबी परिसराजवळ लावलेली बहुतांश रोपे सुकली; वृक्ष संवर्धनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह

। रसायनी । प्रतिनिधी ।

पर्यावरण संवर्धनासाठी शासकीय पातळीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करून मोहिमाच्या मोहिमा राबवल्या जात आहेत. मात्र प्रशासकीय दुर्लक्षामुळे या मोहिमा कागदावरच असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. रसायनी परिसरातील सेबीजवळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाची मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, योग्य निगा न राखल्यामुळे या मोहिमेचा फज्जा उडाला असून, संगोपनाअभावी लावलेली बहुतांश रोपे मृत झाल्याची संतापजनक बाब समोर आली आहे.

या ठिकाणी लागवड केलेल्या रोपांच्या संरक्षणासाठी शासकीय सुरक्षा पाईप (गार्ड) लावले गेले आहेत. या पाईपांवर स्पष्ट अक्षरांमध्ये 'पीडब्यू खालापूर विभाग' आणि 'कर्जत उपविभाग' असे शासकीय विभागाचे नाव आणि 'सेव्ह ट्री, सेव्ह लाईफ'चे संदेश जाहीरपणे मांडण्यात आले आहेत. परंतु, प्रत्यक्ष परिस्थिती अत्यंत बिकट आहे.



कारवाईची मागणी

शासकीय निधीचा असा अपव्यय रोखण्यासाठी आणि कागदावर कागद रंगवणाऱ्या या मोहिमेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे. ज्या संबंधित यंत्रणेच्या अखत्यारीत हे काम येते, त्यांनी तातडीने याकडे लक्ष देऊन मृत रोपटयांच्या जागी नवीन दर्जेदार रोपे लावावीत आणि त्यांचे योग्य संवर्धन करावे, अशी आग्रही मागणी रसायनी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

संगोपन, संरक्षणाकडे दुर्लक्ष

एकीकडे वृक्ष लागवड करायची आणि दुसरीकडे त्यांच्या संगोपनाकडे व संरक्षणाकडे दुर्लक्ष करायचे, यामुळे प्रशासनाचा हा केवळ देखावा असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. वृक्षारोपण केल्यानंतर रोपांना नियमित पाणी देणे, खत घालणे आणि त्यांचे संगोपन करणे आवश्यक असते. परंतु, याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे रोपांचा जीव गुदमरून ती सुकून गेली आहेत.

रोपांची लागवड करण्यात आली, मात्र संगोपनाअभावी पाईपांच्या आत लावलेल्या रोपांच्या काठ्या पूर्णपणे सुकून गेल्या आहेत. त्यांना कोणतीही नवी पालवी फुटलेली नाही. उष्णतेमुळे आणि खत-पाणी न घातल्यामुळे रोपांची पाने पूर्णपणे सुकून गेली आहेत. केवळ मृत लाकडे उरली असल्याचे दिसून येत आहेत. तरी संबंधित विभागाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी निसर्गप्रेमींकडून केली जात आहे.

निवडक



आंबेवाडी नाक्यावर माकडांचा मुक्काम

सुतारवाडी : कोलाड आंबेवाडी नाक्यावरील संजय कुर्ले यांच्या यश दत्त इमारतीवर गेल्या एक महिन्यांपासून सुमारे ३० जंगली माकडे वास्तव्यास आहेत. सकाळ झाली की ही माकडे संपूर्ण इमारतीभोवती त्याचप्रमाणे समोर असलेल्या वडाच्या झाडावर येतात. ही माकडे कोणासही उपद्रव करत नाहीत, असे संजय कुर्ले यांनी सांगितले. मात्र ही माकडे खिडकीतून रूममध्ये जाण्याचा प्रयत्न करतात. यांचा लहान मुलांना त्रास होऊ शकतो. या ३० माकडांपैकी काही मोठी आहेत तर, काही पिल्ले आहेत. सकाळ झाली की माकडे अन्नाच्या शोधार्थ बाहेर येत असतात. रस्त्यावरून जाणारी माणसं त्यांना ब्रेड किंवा अन्य खाद्यपदार्थ देत असतात. या परिसरात मोठमोठी पूर्वी जंगले होती. मात्र गेल्या दहा वर्षापासून या जंगलांना मार्च महिन्यापासून वनवे लागण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. वारंवार लागणाऱ्या वनव्यांकडे वन खाते ठोस पाऊल उचलत नाहीत. परिणामी हिरवीगार जंगलं आता नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे जंगली प्राण्यांचा निवारा नष्ट होत चालला असून निवाऱ्यासाठी त्याचप्रमाणे अन्नाच्या शोधार्थ जंगली प्राणी आता गावात येत आहेत.



दीपक पाटील पुरस्काराने सन्मानित

रसायनी : खालापूर तालुक्यातील वावर्ले येथील सामाजिक कार्यकर्ते तथा कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दीपक गणपत पाटील यांना प्रतिष्ठेच्या 'मराठा भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय क्षेत्रीय मराठा कुर्मी देशमुख समाजाचे अध्यक्ष आय. एस. निरंजन आणि सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील कमलनाथ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी दिल्लीचे अध्यक्ष आर. एन. रॉय उपस्थित होते. दीपक पाटील हे मराठा समाजामध्ये एकजूट निर्माण व्हावी, समाजातील बांधवांनी संघटित होऊन सामाजिक प्रगतीसाठी एकत्रितपणे कार्य करावे, या उद्देशाने सातत्याने प्रयत्नशील आहेत. कानसा वारणा फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले असून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची, संघटनात्मक कार्याची आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना यापूर्वीही विविध पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. 'मराठा भूषण' पुरस्काराने सन्मानित झाल्यामुळे वावर्ले परिसरासह रसायनी-पाताळगंगा विभागातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

'सायबर सुरक्षा आणि अध्ययनार्थी जनजागृती' विषयावर ज्ञानसत्र

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासानातर्फे 'सायबर सुरक्षा आणि अध्ययनार्थी जनजागृती' विषयावर ज्ञानसत्र पार पडले. हे ज्ञानसत्र विकसित भारत-२०४७ सेवा संकल्प उपक्रमांतर्गत विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पनेतून व प्रा. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयोजित करण्यात आले होते. या ज्ञानसत्रात डॉ. प्रकाश खनाळे यांनी अध्ययनार्थींना ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, फिशिंग, सोशल मीडिया खात्यांची सुरक्षितता, पासवर्डचे महत्त्व, ओटीपीची गोपनीयता आणि डिजिटल आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, याविषयी मार्गदर्शन केले. तसेच अनोळखी व्यक्तींना वैयक्तिक माहिती, बँक खात्याचा तपशील किंवा ओटीपी शेअर करू नये, असा सावधगिरीचा सल्ला दिला. सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण मिळविण्यासाठी अध्ययनार्थींनी सतर्क राहणे, संशयास्पद संदेश व लिंक टाळणे आणि कोणत्याही ऑनलाइन फसवणुकीची घटना घडल्यास त्वरित संबंधित यंत्रणेकडे तक्रार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे समन्वयन व सूत्रसंचालन महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. हा ज्ञानसत्र कार्यक्रम सर्व श्रोत्यांसाठी https://avc.ycmou.ac.in व https://avc.ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर कायमस्वरूपी ऐकण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठ दृकश्राव्य केंद्राचे प्रमुख धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक प्रकाश सापनर व गिरीश गवळी यांनी तांत्रिक काम पाहिले. दीपक राजगिरे यांनी सहकार्य केले.



व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप

नेरळ : कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक भागात कार्य करणाऱ्या श्री साई ट्रस्टकडून रोजगारश्रम व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रमाणपत्र देण्यात आली. नेरळ येथे या संस्थेच्या वतीने महिला सबलीकरण कार्यक्रम राबवण्यात येत असून अनेक व्यवसायभीमुख उपक्रम राबविण्यात येत असतात. श्री साई ट्रस्ट नवी मुंबई व सिल फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथील वाल्मिकीनगर भागात असलेल्या आईआप्पा निवास येथे महिला सक्षमीकरण केंद्र चालवले जाते. या ठिकाणी गेली १२ वर्षे महिलांसाठी प्रशिक्षण शिबीर आयोजित केली जात आहेत. यात शिलाई मशीन प्रशिक्षण, एम्ब्रोईडरी प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण सुरू असून असे कोर्स पूर्ण करणाऱ्या महिलांना प्रशिक्षण पूर्ण झाल्याने प्रमाणपत्र वाटप करण्यात आली. यावेळी मंगेश म्हसकर, श्री साई ट्रस्टचे गणेश अय्यर, संचालिका लक्ष्मी अय्यर, राधिका घुले, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले आदी उपस्थित होते.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

मुरूड तालुक्यात भातकापणीला सुरुवात

आगरदांडा : मुरूड तालुक्यात सुमारे ३३०० हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली आहे. यंदा सुरुवातीला पावसाने ओढ दिल्यानंतर अतिवृष्टी आणि त्यानंतर पावसाचा खंड अशा बदलत्या हवामानाचा फटका भात पिकाला बसला आहे. सप्टेंबरनंतर पावसाने दडी मारल्याने भात पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर परिणाम झाला आहे. हवामानाच्या लहरीपणामुळे अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा धूसर झाली असतानाच, जे काही पीक पदरात पडले आहे ते सुरक्षितपणे घरात आणण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी भातकापणीला सुरुवात केली आहे. निसर्गाच्या बदलत्या चक्राशी झुंज देत शेतकरी उरलेले पीक पदरात पाडून घेण्यासाठी धडपडत आहेत.

फराळ, पुस्तकांसह खेळांचे साहित्य वाटप

एकता सामाजिक संस्थेचा सेवाभावी उपक्रम

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दिवाळीचा सण सर्वांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश घेऊन यावा, या सामाजिक भावनेतून एकता सामाजिक संस्थेच्या वतीने पेण तालुक्यातील उंबरमाळ वाडी आणि केळाची वाडी येथील ५१ आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळासह विविध जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या या सेवाभावी उपक्रमाचे यंदा १५ वे वर्ष असून, दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला आयोजित या उपक्रमात प्रत्येक कुटुंबाला विशेष दिवाळी किट देण्यात आली. यामध्ये एक किलो



रवा, मैदा, साखर, एक लिटर खाद्यतेल, पणत्या, रांगोळी, मोती साबण, सुगंधी उटणे आणि मिठाई अशा वस्तूंचा समावेश होता. याशिवाय लहान मुलांना चॉकलेट आणि बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

केवळ दिवाळीचा आनंद देण्यापुरते मर्यादित न राहता मुलांच्या शैक्षणिक आणि बौद्धिक विकासालाही संस्थेने प्राधान्य दिले. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी गोष्टींची पुस्तके, तर मनोरंजनासोबत बुद्धिमत्तेला चालना मिळावी यासाठी सापशिडी, लुडो आणि उनो कार्ड यांसारख्या खेळांचे साहित्य देण्यात आले.

रातवड विद्यालयात स्वयंपाकगृह, विश्रांतीगृहाचे उद्घाटन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व भौतिक सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे. मेश फाउंडेशन व मुंबई येथील प्रविण मेहता यांच्या आर्थिक सहकार्यातून उभारण्यात आलेल्या स्वयंपाकगृह व विश्रांतीगृहाचा उद्घाटन सोहळा शनिवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला.

या सुविधांचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड विभाग संघचालक मा. रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रायगड भूषण मा. कृष्णा महाडिक, शालेय समिती अध्यक्ष सुनील



पाटील, मुख्याध्यापक संतोष कदम, पालकवृंद, उसर विद्यालयाचे शिक्षक विनोद लाड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यालयाच्या विकासासाठी रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि सेवाभावी संघटनांकडून मिळणारे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. नव्याने उभारण्यात आलेले स्वयंपाकगृह विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी उपयुक्त ठरणार असून विश्रांतीगृहामुळे विद्यार्थी व शिक्षकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

■ मेश फाउंडेशन, प्रविण मेहता यांचे आर्थिक सहकार्य

विद्यालयाच्या प्रगतीसाठी आर्थिक सहकार्य करणाऱ्या मेश फाउंडेशन व प्रविण मेहता यांचे संस्थेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

केंद्र शाळेचा गौरव

उरण : रायगड जिल्हा परिषदेच्या आदर्श केंद्र शाळा चिरनेर शाळेचा आवाज मुंबई या प्रसारमाध्यमाच्या वतीने 'आदर्श शाळा' म्हणून गौरव करण्यात आला. मुख्याध्यापक बळीराम पाटील यांनी हा गौरव स्वीकारला. महामुंबई चैनलच्या द्वितीय वर्धापन दिन सोहळ्यात चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेला मान्यवरांच्या हस्ते आदर्श शाळा सन्मान देऊन गौरविण्यात आले. ही शाळा सन १८८४ पासून ज्ञानदानाची अखंड परंपरा जपत गुणवत्तेचा वारसा पुढे नेत आहे.

ईश्वर्जुन फाउंडेशनची सामाजिक बांधिलकी

। नेरळ । प्रतिनिधी ।

ईश्वर्जुन फाउंडेशन, कल्याण आणि कर्जत प्रेस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील नांगुर्ले आदिवासीवाडी येथील लोकांसमवेत दिवाळी साजरी करण्यात आली.

यावेळी ईश्वर्जुन फाउंडेशनच्या अध्यक्षा माधुरी बुधरानी, हरेश बुधरानी, मनीका माटा, दृष्टि माटा, ॲड. हितेश जेसवानी, प्रा. भारत खत्री, प्रा.सोनी नरवानी, प्रा.लवीना मंगतानी, करुणा मेवलानी यांसह तसेच कर्जत प्रेस असोशियनचे सल्लागार दीपक



बोराडे, किशोर गायकवाड, भूषण प्रधान, अध्यक्ष कैलास म्हामले, सचिव रामदास माळी, कार्याध्यक्ष संदेश साळुंखे, उपाध्यक्ष महेश भगत, सहखजिनदार नरेश कोळंबे, सदस्य प्रथमेश कुडेकर, गणेश लोट तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. ईश्वर्जुन फाउंडेशन यांच्याकडून सर्व आदिवासी लोकांना दिवाळी फराळ, कपडे आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी अपघातामुळे अपंगत्व आलेल्या समीर वाघमारे याला व्हीलचेअर देण्यात आली.

प्रेम शांती ट्रस्टकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

■ चार शाळांना पाणी शुद्धीकरण मशीन भेट

। नेरळ । प्रतिनिधी ।

नवी मुंबई येथील प्रेम शांती ट्रस्ट यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. नैनेश बदले यांच्या सहकार्याने प्रेम शांती ट्रस्टकडून जिल्हा परिषदेचा चार शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य आणि पाणी शुद्धीकरण मशीन देण्याचा कार्यक्रम राबवण्यात आला.

यावेळी कंजूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्यूशन असोसिएशन नवी मुंबई अध्यक्ष नरेश शहा, सचिव विजय ताम्हाणे, खजिनदार भरत



दर्जी, जीवन ज्योत फाउंडेशन किसन गायकवाड, अविनाश पवार आणि संतोष मिसाळ आदी उपस्थित होते. कर्जत तालुक्यामधील नेरळ कुंभार आळी, आंबिवली बुद्रुक, एकसळ आणि कुंभे येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे, या हेतूने उत्कृष्ट प्रतीचे वॉटर फिल्टर बसवण्यात आले आले. तर या शाळांमधील सुमारे २५० विद्यार्थी विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी हेमंत फ्युरिया वाशी यांच्यामार्फत दिवाळीनिमित्त महिलांना साड्यांचेदेखील वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
रायगड-अलिबाग हिराकोट तळ्याजवळ,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in ई-मेल: dydeoraigad@gmail.com

क्र/निवडणूक कार्या ६(२)/ मतदार यादी छपाई निविदा/२०२६ दि. ०३/११/२०२६

ई निविदा सुचना क्रमांक ०२/२०२६
मतदार यादी छपाई बाबत ई निविदा सुचना

रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघात निवडणुकीच्या कामासाठी १. प्रारूप मतदार यादी, २. निरंतर पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत तयार होणारी पुरवणी यादी, ३. मा. भारत निवडणूक आयोगाद्वारे घोषित अर्हता दिनांकावर आधारीत विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत तयार होणारी पुरवणी मतदार यादी तसेच अंतिम मतदार यादी ४. निवडणूक अनुषंगाने विषयक इतर छपाई इ. बाबींची छपाई पीडीएफ सीडीवरून छपाई (बडीसह) करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. सदर निविदा ही www.mahaetenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

कामाचे नाव:- रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी व तदनुषंगिक बाबींची पीडीएफ सीडीवरून मतदार यादी छपाई कामाची ई-निविदा.

निविदा अंदाजीत रक्कम	रु. २५,००,०००/-
ई निविदा फार्म शुल्क	रू. ५,४००/- (बिना परतावा)
इसारा / बयाणा (EMD) रक्कम	रू. ९०,०००/-
सुरक्षा अनामत रक्कम	रू.७५,०००/-
ई -निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ	दि. ०३/११/२०२६ सकाळी १०.०० वाजता
ई-निविदा भरण्याचा कालावधी	दि.०३/११/२०२६ सकाळी १०.०० पासून ते दि.१२/११/२०२६ सायंकाळी ०४.०० पर्यंत
निविदा पूर्व बैठक (Probid Meeting) दिनांक वेळ	दि.०५/११/२०२६ सकाळी १२.०० वाजता
ई निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ	दि.१२/११/२०२६ सायंकाळी ०४.०० वाजता
ई. निविदा फार्म क्रमांक - १ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ	दि.१३/११/२०२६ रोजी सायंकाळी ०४.३० वाजता किंवा तद्नंतर
ई- निविदा उघडण्याचे ठिकाण	उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
संपर्क अधिकारी	उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग

निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahaetenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Bricfcase-1 मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई - निविदेत स्कॅन करून PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

६. निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Probid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड

निवडक

विजय ठाकूर यांना देवज्ञा

अलिबाग : अलिबाग तालुक्यातील चौल-सागमळा येथील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते विजय वसंत ठाकूर यांचे



बुधवारी (दि.२८) ऑक्टोबर रोजी निधन झाले. निधनसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, पत्नी, दोन भाऊ, चार बहिणी, चार पुतणे, सात नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर चौल-सागमळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी चौल-सागमळा ग्रामस्थ, नातेवाईक, शेकापसह विविध पक्षातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांकडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचा दशक्रिया विधी गुरवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता, तर तेरावे ७ नोव्हेंबर रोजी होणार असल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.



गव्हाण आरोग्य केंद्राला संगणकाची भेट

चिरनेर : पनवेल तालुक्यातील शेलघरच्या यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला शनिवारी (दि.३१) सुखकर्ता बंगल्यावर आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते संगणकाची भेट देण्यात आली. यावेळी डॉ. अचला पाटील, डॉ.अस्मिता बोबटेकर, संजय गावडे, प्रवीण कोळी, अभिजीत खंडागळे, शेखर घरत, स्वप्निल पाटील, भक्ती पालकर आदी उपस्थित होते. यावेळी घरत यांनी गव्हाण आरोग्य केंद्राच्या समितीचा अध्यक्ष म्हणून मी दहा वर्षांपूर्वी काम सांभाळले असल्याचे सांगून, शिस्तबद्ध कारभारसह रुग्णांच्या विनामूल्य उपचारांवर भर दिला होता. आता या आरोग्य केंद्राची नवीन इमारत बांधण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घरत यांचे आभार मानले.



डेरवली शाळेत आकाशकंदील कार्यशाळा

पनवेल : तालुक्यातील राजिप शाळा, डेरवली येथे 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत आकाशकंदील कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी विविध आकर्षक आकाशकंदील तयार करत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. या उपक्रमासाठी बालभारती कार्यशिक्षण समितीचे सदस्य विद्याधर म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आकाशकंदील तयार करण्याचे तंत्र, त्यामागील संकल्पना आणि कमी साहित्यामध्ये आकर्षक आकाशकंदील बनविण्याच्या सोप्या पद्धतींचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्साहाने आकाशकंदील तयार केले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या कृतीकौशल्याला, कल्पकतेला आणि नवनिर्मिती क्षमतेला चालना मिळाली. विशेष म्हणजे, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकाशकंदील तयार करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा आणि यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त साजरी करण्याचा संदेश दिला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी भोसले, रवींद्र रोटकर, विजेता पाटील, वर्षा पाटील उपस्थित होते.

तळोजा काँग्रेसची निषेध पदयात्रा

नवीन पनवेल : लोकशाही आणि भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी तसेच जनतेच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने तळोजा येथे निषेध पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात आयोजित करण्यात आलेल्या



या आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपला निषेध व्यक्त केला. डॉ. श्रुती म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, तळोजा ब्लॉक अध्यक्ष बबन केणी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. २७ ऑक्टोबर रोजी या निषेध पदयात्रेला सुरुवात झाली. या आंदोलनात सुदाम पाटील, चेतन म्हात्रे, प्रदीप सुनके, हेमराज म्हात्रे, विजय केणी, विशाल केणी, नोफिल सय्यद, अंकुश गायकवाड, गुलाम चारफडे, अनुपमा सिंग, नखात आगा, अफरोज शेख, नाझिर यावू, सोमनाथ सिर्के, धर्मेंद्र सिंग, आबू सलीम, राजेश केणी, आमीना शेख, तेजस केणी, पाशा पटेल, संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नोकरीची सुवर्णसंधी! -** अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!
- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे. विक्री करणे आहे. २० गुंठे जागा अलिबागपासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९०/ २२२७६१

हवामान बदलामुळे फळांचा राजा संकटात

|| आंबा काजू पालवीवर कीड-रोगांचा धोका || सल्ल्यानुसार बागांचे व्यवस्थापन करा

| माणगाव | प्रतिनिधी |

कोकणातील बागायतदारांच्या आर्थिक उत्पन्नाचा प्रमुख आधार असलेल्या आंबा आणि काजू पिकांच्या दृष्टीने सध्या पालवी फुटण्याचा आणि वाढीचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. याच टप्प्यावर बदलत्या हवामानामुळे कोवळ्या पालवीवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने बागायतदारांनी वेळीच दक्षता घेणे आवश्यक आहे.

आंबा-काजू बागांचे संरक्षण करून आगामी हंगामातील मोहर प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालयाने महत्त्वपूर्ण





कृषी सल्ला जारी केला आहे. या सल्ल्यानुसार बागांचे योग्य व्यवस्थापन करून कीड-रोग नियंत्रणाच्या उपाय योजना कराव्यात, असे आवाहन माणगाव तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे.

आंबा आणि काजू पिकांच्या उत्पादनावर पालवीची निरोगी वाढ, हवामानातील बदल आणि कीड-रोगांचे नियंत्रण यांचा थेट परिणाम होत असतो. त्यामुळे सध्याच्या संवेदनशील काळात बागांकडे दुर्लक्ष करणे बागायतदारांना महागात पडू शकते.

योग्य वेळी निरीक्षण, शिफारशीनुसार औषधांचा वापर आणि जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यावर भर देण्याची गरज आहे.

आंबा बागांमध्ये अनेक ठिकाणी नवीन पालवी फुटली असून, या कोवळ्या पालवीवर तुडतुड्या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास पिकाचे नुकसान होऊ शकते. ही कीड पालवीतील रस शोषून घेते. .त्यामुळे पालवीवर चिकट पदार्थ साचून त्यावर काळ्या बुरशीची वाढ होण्याचा धोका निर्माण होतो. यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या उपाययोजना नुसार प्रति १० लिटर पाण्यात डेल्टामेथ्रीन ९ मिलिलिटर मिसळून फवारणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पावसामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास थायोफिनेट मिथाईल १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. औषधाची फवारणी करताना ते कोवळ्या पालवीवर व्यवस्थित पसरून टिकून राहण्यासाठी योग्य प्रमाणात स्टीकर किंवा स्प्रेडरचा वापर करण्याचेही मार्गदर्शन करण्यात आले आहे.

बागायतदारांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. ढगाळ वातावरणात काजू पिकावर ढेकण्या किडीचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ६ मिलिलिटर प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. झाडांच्या बुंध्याभोवती जैविक आच्छादन अर्थात मल्चिंग केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होईल.

तज्ज्ञांचा सल्ला घ्या

कोकणातील आंबा आणि काजू ही केवळ फळपिके नसून, हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार आहेत. त्यामुळे पालवीच्या अवस्थेपासूनच योग्य व्यवस्थापन केल्यास पुढील मोहर आणि उत्पादनासाठी पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते. कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेताना औषधांचे प्रमाण, वापराची वेळ, लेबल वरील सूचना आणि सुरक्षिततेचे नियम पाळावेत.



प्रणम्य प्रतिष्ठानकडून दिवाळी बाजारपेठ

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातून गृहउद्योग करणाऱ्या महिलांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी दिवाळी बाजारपेठ प्रणम्य प्रतिष्ठानकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. दोन दिवस नेरळमध्ये ही स्थानिकांच्या व्यवसायाची बाजारपेठ उघडली असून सर्व प्रकारच्या हँडमेड वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.नेरळ येथील नेरळ फेस्ट यशस्वी झाल्यास पुढील काळात मोठ्या मैदानावर बचत गट आणि स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्यांना संधी दिली जाईल असे आश्वासन सुनीता मोरे यांनी दिले आहे.

याप्रसंगी सुवर्णा जोशी, ॲड. प्रांजली मोरे, प्राची मनवे, साक्षी गुरव, विरले, सुजाता मोहिते, नीता हनुमंते, योगिता डागा, अपूर्वा गजमल आदी उपस्थित होत्या.

दुचाकीची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील शिवाजीनगर झोपडपट्टी परिसरातून घराबाहेर पार्क केलेली सुमारे ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शितल पाटील यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यांनी आपली अँटोनिक टीव्हीएस मोटारसायकल (क्रमांक एमएच ४६ डीबी ०२६२) शिवाजीनगर झोपडपट्टी क्रमांक १, दत्त हॉटेलच्या बाजूला पार्क करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने त्यांची दुचाकी चोरून नेली. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सचिन पोवार करीत आहेत.

कार्ले आदिवासीवाडीत विद्यार्थ्यांना कपडे वाटप

डॉ. रसिक साळुंके परिवाराचा स्तुत्य उपक्रम

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |

दिवाळी सणाचे औचित्य साधून माऊली हॉस्पिटल, बोर्ली पंचतन येथील डॉ. रसिक साळुंके यांच्या पुढाकाराने श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले आदिवासीवाडी येथील विद्यार्थ्यांना कपडे, शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आदिवासीवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, त्यांची दिवाळी अधिक आनंददायी झाली.

या कार्यक्रमास डॉ. रसिक साळुंके, डॉ. वृषाली साळुंके व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. तसेच डॉ. बापट, जगनर, हुलगे, हगावने, गवळी, चोरमले, बंटी पाटील, जयंता वाघमारे तसेच कार्ले आदिवासीवाडीतील



महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी विद्यार्थ्यांना कपडे, शैक्षणिक उपयोगाच्या वस्तू व खाऊ देण्यात आला. आपल्या हातात नवीन कपडे, शालेय साहित्य आणि खाऊ मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद सर्वांसाठी समाधानाचा क्षण ठरला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मन लावून शिक्षण घेण्याचे व उज्ज्वल भवितव्य घडविण्याचे आवाहन केले.

रोषणाईने उजळणार सोसायटीचे मैदान

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

दीपावली सणाचे औचित्य साधून पनवेलमधील सोसायटीच्या मैदानावर यंदा भव्य दीपावली महोत्सव आयोजित करण्याची तयारी सुरू झाली आहे. दिवाळीच्या स्वागतासाठी परिसर सजविण्याचे काम हाती घेण्यात आले असून, संपूर्ण परिसर रोषणाईने उजळून निघणार आहे. यंदाच्या महोत्सवात 'दिव्यांची दीपावली' ही संकल्पना विशेष आकर्षण ठरणार आहे.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मैदानातील झाडांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येत आहे. तसेच मैदानाच्या



आजूबाजूच्या सोसायट्यांवरही रंगीबेरंगी दिव्यांची सजावट केली जात आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर प्रकाशाने उजळून निघणार आहे.

यंदाच्या दीपावली महोत्सवात नागरिकांसाठी खास सेल्फी पॉईंट उभारण्यात येणार आहे. कुटुंबीय, मित्रमंडळी आणि लहान मुलांना दिवाळीच्या आठवणी छायाचित्रांच्या माध्यमातून जतन करता याव्यात, यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. आकर्षक सजावट आणि रोषणाईच्या पार्श्वभूमीवर सेल्फी काढण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि उत्साहाचा सण. आधुनिक विद्युत रोषणाईसोबत पारंपरिक दिव्यांचे महत्त्व जपण्याचा प्रयत्न यंदाच्या महोत्सवातून केला जाणार आहे. त्यामुळे लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठी हा दीपोत्सव आनंदाची पर्वणी ठरण्याची शक्यता आहे.

सोसायटीच्या मैदानावर सुरू असलेली तयारी पाहता यंदाची दिवाळी अधिक आकर्षक आणि उत्साहपूर्ण होणार असल्याचे चित्र आहे. रोषणाई, सजावट आणि 'दिव्यांची दीपावली'मुळे पनवेलकरांना यंदा प्रकाशाचा अनोखा सोहळा अनुभवायला मिळणार आहे.



पनवेल प्रशासन वाहतूक कोंडीमुक्तीसाठी सज्ज

| पनवेल | प्रतिनिधी |

दिवाळीच्या खरेदीसाठी पनवेल शहरात होणारी गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिका व वाहतूक पोलिसांनी संयुक्तपणे पाच ठिकाणी तात्पुरत्या वाहनतळांची व्यवस्था केली आहे. या वाहनतळांवर सुमारे ५०० मोटारी उभ्या करता येणार आहे. १ नोव्हेंबरपासून ही व्यवस्था कार्यान्वित करण्याचे नियोजन केले आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये वाढणारी गर्दी लक्षात घेऊन महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी पनवेल शहर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे आणि प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे उपस्थित होते.

बैठकीत बापट वाडा येथील सुरू असलेल्या बांधकामाच्या जागेत ६० मोटारी, कर्मवीर भाऊराव चौक ते कर्नाळा भाजी मार्केटदरम्यान रस्त्याच्या दुतर्फा ५० हून अधिक मोटारी, नाट्यगृह व परिसरातील वाहनतळावर १२० मोटारी, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाशेजारील मोकळ्या जागेत २५० हून अधिक मोटारी उभ्या करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या जागा वाहनतळासाठी सज्ज करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

दरम्यान, वाहतूक नियमनासाठी महापालिकेने महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ६० जवान पोलिसांच्या मदतीसाठी उपलब्ध करून दिले आहेत. हे जवान शहरातील विविध वाहतूक सिग्नलवर कार्यरत असून, दिवाळीच्या काळात अतिरिक्त मनुष्यबळही तैनात करण्याची मागणी वाहतूक पोलिसांनी केली आहे. दिवाळी खरेदीसाठी शहरात येणाऱ्या नागरिकांनी निर्धारित वाहनतळांचाच वापर करावा. रस्त्यांवर अस्ताव्यस्त वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नये. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुजारी यांनी केले आहे.

'कामोठ्यात डायलिसिस सेंटर सुरू करा'

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

कामोठे शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खारघर आणि नवीन पनवेलच्या धर्तीवर कामोठे शहरात सुसज्ज डायलिसिस सेंटर सुरू करावे, अशी मागणी नगरसेविका हेमलता गोवारी यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

कामोठे शहरातील अनेक रुग्णांना मूत्रपिंडाच्या आजारांमुळे नियमित डायलिसिस उपचारांची गरज भासते. मात्र, सध्या कामोठे परिसरात पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचारांसाठी इतर शहरांमध्ये जावे लागते. यामुळे रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांचा वेळ, पैसा आणि शारीरिक त्रास



वाढत आहे.विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना वारंवार डायलिसिसचा खर्च परवडणे कठीण होत आहे. त्यामुळे कामोठे शहरातच आधुनिक सुविधांनी युक्त डायलिसिस सेंटर सुरू झाल्यास परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळू शकतो.

यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात अथवा योग्य शासकीय जागेत डायलिसिस सेंटर सुरू करावे. तसेच केंद्रासाठी प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी, तंत्रज्ञ आणि आवश्यक वैद्यकीय उपकरणांची व्यवस्था करून गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी गोवारी यांनी केली आहे.

नवीन पनवेलमधील उद्यानांची दुरवस्था

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेलमधील प्रभाग क्रमांक १७ अंतर्गत येणाऱ्या उद्याने आणि ग्रीन बेल्ट परिसरांची दुरवस्था झाली असून, स्वच्छता व देखभालीअभावी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. उद्यानांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा, पालापाचोळा, प्लास्टिक पिशव्या, दारूच्या आणि पाण्याच्या बाटल्या साचल्या आहेत. तसेच नियमित पाणी न मिळाल्याने शोभेची झाडे सुकू लागली आहेत. या समस्येकडे लक्ष वेधत नगरसेवक ॲड. मनोज सिंधू कृष्णाजी भुजबळ यांनी महापौरांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलिसांचा निर्णय **पुढील आदेशापर्यंत निर्बंध राहणार कायम**

खांदा कॉलनीत चार तास 'नो पार्किंग'

| पनवेल | प्रतिनिधी |

खांदा कॉलनी परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खांदा कॉलनी सिग्नल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच आदईकडे जाणाऱ्या पुलाच्या दोन्ही बाजूंच्या रस्त्यांवर दररोज सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत 'नो पार्किंग' लागू करण्यात आले आहे. १ नोव्हेंबर २०२६ पासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून पुढील आदेशापर्यंत हे निर्बंध कायम राहणार आहेत.

खांदा कॉलनी परिसरात



लोकसंख्या आणि वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, वाहनांसाठी पुरेशी अधिकृत पार्किंग व्यवस्था नसल्याने अनेक वाहनचालक रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करतात. परिणामी, रस्त्यांची वाहतूक क्षमता कमी होऊन दररोज वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

खांदेश्वर रेल्वे स्थानक जवळ असल्याने या परिसरातून मोठ्या संख्येने नोकरदार वर्ग रेल्वेने प्रवास करतो. सायंकाळी कार्यालये सुटण्याची आणि शाळा सुटण्याची वेळ एकाच वेळी येत असल्याने रस्त्यांवर वाहनांची गर्दी वाढते. त्यात शाळांच्या बस, व्हॅन आणि रिक्षांची भर पडल्याने खांदा कॉलनी सिग्नल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि आदई पुलापर्यंत वाहतुकीचा वेग मंदावतो.

या समस्येवर उपाय म्हणून कळंबोली वाहतूक शाखेने संबंधित मार्गांवर सायंकाळी चार तास नो पार्किंग लागू करण्याचा प्रस्ताव वाहतूक विभागाकडे सादर केला होता. दरम्यान, या निर्णयामुळे खांदा कॉलनीतील सायंकाळची वाहतूक कोंडी कितपत कमी होते, याकडे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांचे लक्ष लागले आहे.

अत्यावश्यक सेवांमधील वाहनांना सूट

या निर्बंधातून जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारी वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, शासकीय वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवांमधील वाहनांना सूट देण्यात आली आहे.

बेघरांसाठी ‘अनंत आश्रय’

खांदेश्वर : समाजातील निराधार, बेघर मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना हक्काचा निवारा, सुरक्षितता आणि सन्मानाचे जीवन मिळावे, या उद्देशाने कर्जत येथे ‘अनंत आश्रय’ हा महत्त्वाकांक्षी सामाजिक प्रकल्प उभारण्यात येणार आहे. रिलायन्स फाउंडेशनच्या संस्थापक आणि समाजसेविका नीता मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कन्याही उपस्थित होत्या.

या प्रकल्पाच्या माध्यमातून निराधार मुलांचे संगोपन, शिक्षण आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी घेतली जाणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना निवास, आवश्यक सुविधा आणि काळजी उपलब्ध करून दिली जाणार आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांना प्रेम, माया आणि सुरक्षित वातावरण देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. किशोर शेषमल जैन कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे - गुढवण, तालुका - कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत

गावाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
मौजे गुढवण	५४	२/ब	१.०४.००	०.५८

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०३/११/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
ॲड.लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. ५०४, गजवक्र रेसिडेन्सी, पाचवा मजला, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड अलिबाग

कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड, ‘‘वेदांत’’ इमारत, रूम नं. ०१, तळ मजला, पंतनगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. पिन - ४०२ २०१
office Tel:- ९६५७२६०४१८ Email:-mh-rai@pmgsy.nic.in

निविदा सूचना क्रमांक ०३/२०२६-२७ (2nd Call)

कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड या कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेसाठी एक वाहन व उप अभियंता (प्रमंग्रासयो), उप विभाग- माणगाव, पनवेल, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड यांचेसाठी प्रत्येकी एक वाहन प्रतिमाह दराने भाड्याने घेणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहोत. दि.०३.११.२०२६ पासून ते दि.०९.११.२०२६ पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेची माहिती वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. तसेच कोऱ्या निविदा फॉर्म वरील कार्यालयात उपलब्ध आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
रायगड अलिबाग

‘‘जाहिर नोटीस’’

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरंडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुनिल भाऊ म्हात्रे आणि स्नेहा सौमित्र पाटील यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे आशिलांची त्याच्याबरोबर बोलणी सुरु आहे.

मिळकतीचे वर्णन :-

गाव	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार रू. पै.
मौजे.वरंडे, ता.अलिबाग, जि.रायगड	२२७	क्षेत्र ०-२६-४० पो.ख ०-०२-०० एकूण ०-२८-४०	६-४८

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०३/११/२०२६

सही /-
ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं.९२७१७७५२७७

कोंकण रेलवे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम)

निविदा सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यावतीने उप मुख्य अभियंता/वर्क्स, कारवार यांनी खालील खुल्या निविदा ireps.gov.in पोर्टलद्वारे आमंत्रित केल्या आहेत. **कामाचे नाव** – कर्नाटक राज्यातील मुल्की रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक 1 ते प्लॅटफॉर्म क्रमांक 2 यांना जोडणाऱ्या रॅम्पसह फूट ओव्हर ब्रिजचे बांधकाम. **निविदा क्र.: केआर/केडब्ल्यू/डब्ल्यू/2026/46/सीबी/आर1, कामाचा खर्च :** ₹ 198.67/- लाख (जीएसटी वगळून), **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ :** 20/11/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. पुढील माहितीसाठी उप मुख्य अभियंता, वर्क्स, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, कारवार यांच्या कार्यालयाशी संपर्क साधा. अधिक माहितीकरिता https://www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मोग्रज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सुरेश बाळाराम बदले यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार (रू. पै.)
३५	११	०-१३-००	०=१०

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/११/२०२६

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर १७३, एकूण क्षेत्र ०-१७-३० हे.आर., आकार ४.०७ रू.पै. ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मधुकर रामचंद्र घरत मु. बेलवली, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/११/२०२६

(ॲड. संजय द.म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे सालिंदे, ता.पेण जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली संपूर्ण मिळकत विद्यमान मालक १) आंबीबाई दगडू ठाकूर, २) संदीप दगडू ठाकूर, ३) भगवान दगडू ठाकूर, ४) रविंद्र दगडू ठाकूर, ५) मंदाकिनी अनंत पाटील, ६) वंदना दगडू ठाकूर, (७) सुवर्णा महेश पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकी हक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे सालिंदे, ता. पेण, जि. रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकारणी रू.पैसे.
६८/१ ड	०२-८३-००	७.५०

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०२/११/२०२६

ॲड. रविंद्र विनायक ओक
‘‘गुरूकृपा’’ महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र / शुद्धीपत्रक दिले असुन **वाटपपत्र/ करारनामा** करणे प्रस्तावित आहे.

अ. क्र.	गाव व संचिका क्र.	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर.)	मंजूर पात्रता	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती
ता.पनवेल, जि.रायगड								
१	रोडपाली	८५	४५/०	०-६४-०	**दिवाणी दावा क्र. ३१९/२०१७ मधील मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. १)** कै. पांडूरंग नथु ठाकूर(मयत) यांचे वारस **प्रतिवादी क्र. ३)** कै. हौसाबाई बाळाराम पाटील(मयत) यांचे वारस यांचे प्रत्येकी **१/४ वादी १०६९.९१ चौ.मी प्रस्तावित**	**भुखंड क्र. ११ए, सेक्टर–१६, क्षेत्र १०६९.९१ चौ.मी रोडपाली नोड**	१) कै. पांडूरंग नथु ठाकूर(मयत) यांचे वारस १.१) श्रीमती. जमनाबाई पांडूरंग ठाकूर, १.२) श्री. आनंद पांडूरंग ठाकूर, १.३) श्री. किशोर पांडूरंग ठाकूर, १.४) धनश्री पांडूरंग ठाकूर, १.५) कै. जगदीश पांडूरंग ठाकूर(मयत) यांचे वारस १.५.१) श्रीमती. निशा जगदीश ठाकूर, १.५.२) मनाली जगदीश ठाकूर, १.५.३) मृण्मयी जगदीश ठाकूर, १.५.४) वेदीका जगदीश ठाकूर ३) कै. हौसाबाई बाळाराम पाटील(मयत) यांचे वारस ३.१) कै. भरत बाळाराम पाटील(मयत) यांचे वारस ३.१.१) सौ. भुमिता रमेश मढवी, ३.१.२) श्री. आकाश भरत पाटील, ३.१.३) श्री. भूषण भरत पाटील, ३.२) कै. रविंद्र बाळाराम पाटील(मयत) यांचे वारस ३.२.१) श्रीमती. जयश्री रविंद्र पाटील, ३.२.२) श्रध्दा रविंद्र पाटील, ३.२.३) भक्ती रविंद्र पाटील, ३.२.४) शुभम रविंद्र पाटील, ३.२.५) गौरव रविंद्र पाटील, ३.३) सौ. गिता अंकूश मुकादम व ३.४) सौ. शैला आनन मढवी	निरंक
२	रोडपाली	८५(२)	४१२/१	०-५१-९				
३	रोडपाली	२६	१६९/०	०-३१-१				
४	रोडपाली	११४	४३७/४४	०-२६-३				
५	रोडपाली	१४४	४३८/३६	०-१४-२				
			४३८/६०	०-१६-२				
			४३८/६९पै	०-६०-०				
६	रोडपाली	१६१(२)	३३५/२(१)	०-०१-३				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित जमिनीबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल/उरण)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२८९/२०२६–२७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नेरळ ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्यासाठी घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं.	हिस्सा नं	क्षेत्र चौ.मी.	आकार रू.पै.
दिपक आवत वलेचा व इतर	६२	९	०.१५.००	१.७६
	६२	८/ब	०.०७.००	०.७६

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दि- ०३.११.२०२६

ॲड. अशोक पालू डुकरे
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहिर नोटीस

दिनांक : ०३/११/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल प्रसाद रजनीकांत शेठ यांनी अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात, विशेष दिवाणी दावा क्र.८०/२०२६ हा दावा कराराची विशेष पुर्तता करण्याकरीता. ठरावाकरीता निरंतर मनाई हुकूमा करीता सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांचेविरूद्ध दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा विषय खालील मिळकतीशी संबंधित आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पैसे)
म्हात्रोळी, ता.अलिबाग	२२६/१/२	२-३१-९० हे.आर सदर जमिनीपैकी १-०५-६० हे.आर.पॉ. क्षेत्राची जमीन मिळकत या दाव्याचा विषय आहे.	१६-४३ पैसे

वरील मिळकतीसंदर्भात मिळकतीचे मालक सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांनी आमचे अशिलांना दि.०६/११/२०२३ रोजी साठेकरार करून दिलेला आहे. आमचे अशिलांना अशी माहिती झाली आहे की, मिळकतीचे मालक या मिळकतीमध्ये अन्य त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करीत आहेत व सदर मिळकतीमधील काही क्षेत्र विकण्याचे तयारीत आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत विशेष दिवाणी दावा क्र.८०/२०२६ हा दावा प्रलंबित असल्याने अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमांनी आमचे अशिलांचे हक्कावर बाधा येईल असे कृत्य करू नये. तसेच आमचे अशिलांनी दिनांक २०/०८/२०२६ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग येथील सदर मिळकतीबाबत लिज पेंडन्सी रजिस्टर करण्यात आलेली आहे. सदर मिळकतीचे मालक सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांचेसोबत कोणताही व्यवहार करू नये त्यास आमची सक्त हरकत राहील, सदरील कोणताही बेकायदेशीर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही /-
ॲड. रूखसार अ. मुजावर
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
मो.नं. ७०३०६२७५८७

CHANGE IN NAME

I, MUKHTAR HASAN HARNEKAR, RESIDENT OF AT. POST-MORBA, TALUKA-MANGAON, DISTRICT-RAIGAD, MAHARASHTRA, 402117, hereby declare and affirm that my old name was MUKHTAR AHMED HASAN HARNEKAR. I have changed my name from MUKHTAR AHMED HASAN HARNEKAR to MUKHTAR HASAN HARNEKAR for all future purposes, including passport issuance.

SIGN
MUKHTAR HASAN HARNEKAR
(New Name)

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत व त्यामध्ये असलेले घर कंम्पाउंड सहित, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.शशिकांत तुकाराम फुलारे यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकांबरोबर साठेकरार सुद्धा झालेला आहे.

मिळकतींचे वर्णन

अ) जमिन मिळकतीचे वर्णन :-

मौजे	गट नंबर	क्षेत्र(हे.आर.)	आकार (रू.पै.)
आरावघर, ता.मुरूड,	५५	०-५८-०० पो.ख.०-०३-०० एकूण ०-६१-००	१५.५०

सदरहू मिळकतीपैकी श्री.शशिकांत तुकाराम फुलारे यांच्या मालकीची ०-३५-० हे.आर., आकार ८.५५ रू.पै.इतक्या क्षेत्राची मिळकत.

ब.घर मिळकतीचे वर्णन :-

मौजे	घर नंबर	क्षेत्र (चौ.फूट)	असेसमेंट (रू.पै.)
मजगांव, ता.मुरूड, जि.रायगड	८८६	४८०	८६०

सदर मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती या निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुरूड
दिनांक : ०२/११/२०२६

सही/-
ॲड.प्रथमेश प्र.पोतदार
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
मोदकम हॉटेल शेजारी, अलिबाग
ता.अलिबाग जि.रायगड
मोबा नं.७७६९०८०३३५

दिनांक : ०२/११/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड, सर्व्हे नं./हिस्सा नं. ८०/५, एकुण क्षेत्र ०-२२-३० हे. आर. आकार ४.६३ रू. पैसे या मिळकतीपैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-०३-१५ हे. आर. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संदेश सदाशिव घरत रा. मु. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ०२/११/२०२६

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड

जा.क्र. ८०९

फॉम झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २३/०६/२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार में. रिद्धी सिद्धि कन्स्ट्रकशन श्री. महेश लक्ष्मण पाटील बस स्टँड जवळ, बांदिवडेकर बिल्डिंग, रूम नं.६, दुसरा मजला, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १२/०६/२०२५ पर्यंतची रक्कम रूपये ७०,९१, ६६१.७०/- व दिनांक १३/०६/२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून
सौ. संध्या एकनाथ पाटील यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन
गाव धोंडपाडा ता.पेण सर्वे क्र.२८/१ क्षेत्रफळ ०-४३-७०
येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १२/०६/२०२५ रोजी येणे रक्कम रूपये ७०,९१,६६१.७०/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन
कर्जदार :- श्री. महेश लक्ष्मण पाटील

१. सौ. संध्या एकनाथ पाटील यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन गाव धोंडपाडा ता. पेण सर्वे क्र.२८/१ क्षेत्रफळ ०-४३-७०

स्थळ : पेण
दिनांक : ०२/११/२०२६

सही/-
ए.एन.भगत
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक - (१) रमाकांत रामचंद्र कवळे, (२) सुरेश रामचंद्र कवळे, (३) मयूर मंगेश कवळे, (४) मोहिनी मंगेश कवळे व (५) साहिल मंगेश कवळे यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन)

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे परहूरपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक १३, एकूण क्षेत्रफळ ०.३१.१० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.२८.१० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०३.०० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. ६.४४, ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३ नोव्हेंबर २०२६


क्वाड्रा लीगल करीता
सही /-
विक्रांत झुंजारराव
(+९१ ९८३३६२५९९५)

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक

रचिन अन् चॅम्पमॅन टीममधून बाहेर

वेलिंग्टन : ४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या या मालिकेत मार्क चॅपमन आणि रचिन रवींद्र खेळू शकणार नाहीत. मार्क चॅपमनला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली आहे, तर रचिन खांद्याच्या दुखापतीतून सावरत आहे. परिणामी, टीम सेफर्ट संपूर्ण एकदिवसीय मालिकेसाठी संघात कायम राहील. हेन्री निकोल्स फक्त सलामीचा सामना खेळेल. डीन फॉक्सक्रॉफ्ट चौथ्या आणि पाचव्या एकदिवसीय सामन्यांसाठी संघात असेल. अतिरिक्त गोलंदाजीचा पर्याय म्हणून मॅट फिशरही संघात कायम राहील. मॅट हेन्रीची उपलब्धता त्याच्या तंदुरुस्तीवर अवलंबून आहे. वेलिंग्टन फायरबर्ड्सविरुद्धच्या दुसऱ्या



सामन्यात कँटरबरीसाठी ११९ धावा करून निकोल्सने संघात आपले स्थान निश्चित केले. लिस्ट ए क्रिकेटमधील हे त्याचे १३ वे शतक होते. भारत अ विरुद्धची रेड-बॉल मालिका पूर्ण केल्यानंतर फॉक्सक्रॉफ्ट न्यूझीलंड संघात सामील होईल. प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी दिली माहिती अलीकडील स्कॅनमधून असे दिसून आले आहे की, चॅपमनला पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी आणखी दोन आठवड्यांच्या पुनर्वसनाची आवश्यकता आहे. रवींद्रच्या उजव्या खांद्यालाही पूर्ण क्षमतेने क्षेत्ररक्षण करता यावे यासाठी बरे होण्यास अधिक वेळ लागेल.

कर्णधार हरमनप्रीतची हॅट्ट्रिक

नवी दिल्ली : भारतीय हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये मलेशियाचा ४-२ असा पराभव केला. कर्णधार हरमनप्रीत सिंहने हॅट्ट्रिक केली. त्याने ३ पेनल्टी कॉर्नरवर गोल केले.हा सामना जालंधर येथील ऑलिम्पियन सुरजीत सिंह स्टेडियममध्ये खेळवण्यात आला. या विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील आपली अजिंक्य मोहीम कायम राखली आहे. भारताने आपले चारही सामने जिंकून गुणतालिकेत पहिले स्थान मिळवले आहे.स्पर्धेतील ४ उपांत्य फेरीतील संघ आधीच निश्चित झाले आहेत. यामध्ये भारत, मलेशिया, जपान आणि दक्षिण कोरिया यांचा समावेश आहे. हरमनप्रीतने तिसऱ्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर गोल करत



संघाला आघाडी मिळवून दिली. मलेशियानेही चांगले आव्हान दिले आणि हाफ टाइमपर्यंत स्कोअर १-१ असा केला.दुसऱ्या हाफमध्ये भारताने पुन्हा आक्रमक खेळ दाखवला. हरमनप्रीतने ३३व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर दुसरा गोल केला. यानंतर सुखजीत सिंगने ४३व्या मिनिटाला गोल करत भारताची आघाडी ३-१ अशी केली.५८व्या मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी स्ट्रोकचे गोलमध्ये रूपांतर करून आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. मलेशियासाठी शेलो सिल्व्हेरियसने शेवटच्या मिनिटाला गोल केला. मात्र, तोपर्यंत भारताचा विजय निश्चित झाला होता. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही भारत आणि मलेशिया आमनेसामने होते. यावेळी मलेशियाच्या संघाने उत्तम बचाव करत भारतीय खेळाडूंच्या पासिंग मूव्ह्स रोखण्याचा प्रयत्न केला. भारताचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन आणि कर्णधार हरमनप्रीत यांनीही मान्य केले की संघाला मिळालेल्या संधींचा अधिक चांगला उपयोग करावा लागेल.रविवारच्या सामन्यांनंतर उपांत्य फेरीत पोहोचणारे चारही संघ निश्चित झाले.



अफगाणिस्तानकडून कांगारूंचा पराभव

हाँगकाँग : अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून पराभव करत प्रथमच हाँगकाँग सिक्सेसचे विजेतेपद पटकावले. हाँगकाँगमध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने ६ षटकांत ११५ धावा केल्या. अफगाणिस्तानने ५.१ षटकांत लक्ष्य गाठले. इमरान मीरने १४ चेंडूंवर नाबाद ५३, तर फरमानुल्लाह सफीने ७ चेंडूंवर नाबाद २६ धावा केल्या.इमरानने ७ षटकार लगावले, फरमानुल्लाहने ४ षटकार ठोकले. दोघांनी नाबाद भागीदारी करत अफगाणिस्तानला ४ गडी राखून विजय मिळवून दिला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ६ षटकांत ११५ धावा केल्या. मॅक्स ब्रायंटने ४४ धावांची खेळी केली. निक हॉबसनने २३, तर ॲलेक्स रॉसने १० चेंडूंत नाबाद २९ धावा केल्या. अफगाणिस्तानकडून नांगेलिया खान आणि करीम जनत यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. ११६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने ११९ धावा करून विजय मिळवला. इमरान मीरने १४ चेंडूंत नाबाद ५३, तर फरमानुल्लाह सफीने ७ चेंडूंत नाबाद २६ धावा केल्या. दोघांनी मिळून संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

सिंधू, लक्ष्यला विजेतेपद

नवी दिल्ली : भारतीय बॅडमिंटनपटूंसाठी रविवारचा दिवस घवघवीत यशाचा ठरला. महिला एकेरीत पी. व्ही. सिंधू हिने, तर पुरुष एकेरीत लक्ष्य सेन याने हायलो ओपन सुपर ५०० या



बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकावले. पी. व्ही. सिंधू हिचे यंदाच्या मोसमातील हे दुसरे विजेतेपद होय.. दुसऱ्या मानांकित पी. व्ही. सिंधू हिने जेतेपदाच्या लढतीत लाईन होजमार्क हिला २१-१२, २१-१४ असे नमवले. पी. व्ही. सिंधू हिने ३९ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. सातव्या मानांकित लक्ष्य सेन याने चौथ्या मानांकित जोनाथन ख्रिस्ती याला २१-१७, २१-१० असे सहज पराभूत करताना लक्षणीय खेळ केला. त्यानेही ३९ मिनिटांमध्येच विजयाला गवसणी घातली.विजयानंतर बोलताना पी. व्ही. सिंधू म्हणाली, समोरचा प्रतिस्पर्धी कोण आहे याचा विचार न करता माझे १०० टक्के देणे माझ्यासाठी महत्त्वाचे होते.

भारताने गाठला ४०० षटकारांचा टप्पा

टीम इंडियाची तोडफोड बॅटिंग; संघाचा जागतिक विक्रम पटलावर

। हॅमिल्टन । वृत्तसंस्था ।



भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाचवा आणि अंतिम टी २० आंतरराष्ट्रीय सामना हॅमिल्टन येथील सेडन पार्कवर खेळला गेला. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ८ विकेट्स गमावून १९१ धावा केल्या. भारतीय संघाच्या काही खेळाडूंनी चांगली खेळी केली, परंतु मधल्या फळीतील फलंदाज अपयशी ठरले. मात्र, या सामन्यात अनेक चौकार आणि षटकारांचा वर्षाव झाला. सामान गमावला असला तरी, भारतीय संघाने या सामन्यात इतिहास रचला आहे. संघाने २०२६ मध्ये आतापर्यंत ४०० षटकार मारले आहेत. एका कॅलेंडर वर्षात ४०० टी २० आंतरराष्ट्रीय षटकार मारणारा भारत आता पहिला संघ ठरला आहे.

टीम इंडियाने एका कॅलेंडर वर्षात ४०० षटकार मारले आहेत. भारताने यावर्षी आतापर्यंत ४० सामने खेळले आहेत. आतापर्यंत कोणत्याही संघाने एका कॅलेंडर वर्षात कोणीही ४०० षटकार मारलेले नाहीत. विशेष म्हणजे, भारताने न्यूझीलंडविरुद्ध १४२ षटकार मारले होते. टीम इंडियामध्ये अभिषेक शर्मा, ईशान किशन, संजू सॅमसन आणि वैभव सूर्यवंशी यांच्यासारखे आक्रमक फलंदाज आहेत. हे सर्व पॉवर हिटर आहेत. विशेषतः अभिषेक आपल्या खेळीत षटकार मारण्यावर अवलंबून असतो. त्याने आतापर्यंत ८० पेक्षा जास्त षटकार मारले आहेत. संजू आणि ईशान यांनीही षटकारांच्या बाबतीत अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.

भारतीय फलंदाजांचा आक्रमक फॉर्म यावर्षी न्यूझीलंडविरुद्धही कायम राहिला. २०२६ मध्ये दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० सामन्यांमध्ये भारताने एकूण १४२ षटकार ठोकले. एका कॅलेंडर वर्षात एकाच संघाविरुद्ध ठोकलेल्या षटकारांच्या बाबतीत ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील या मालिकेत फलंदाजांनी वारंवार चेंडू जबरदस्त षटकार ठोकले. या पाच सामन्यांच्या मालिकेत एकूण ११६ षटकार मारण्यात आले. एकाच टी २० आंतरराष्ट्रीय मालिकेत मारलेल्या षटकारांची ही चौथी सर्वाधिक संख्या आहे.जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांच्यातील २०२६ ची मालिका एकूण १३२ षटकारांसह यादीत अव्वल स्थानी आहे. इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील २०२३ ची मालिका १२० षटकारांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर, ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यातील मालिकेत ११७ षटकार ठोकले गेले.



हिरानंदानी फाऊंडेशन स्कूलचे विजेतेपद

२८ शाळांमधील १२६ संघांचा सहभाग

। चिरनेर । प्रतिनिधी ।

आधुनिक तंत्रज्ञान आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा संगम असलेल्या टीसीएस इनक्विझिटिव्ह या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेच्या मुंबई फेरीत ठाण्यातील हिरानंदानी फाऊंडेशन स्कूलने विजेतेपद पटकावले. रोशन कन्ना आणि विवान कुंदेतकर या विजेत्या जोडीने राष्ट्रीय उपांत्य फेरीत स्थान मिळवले.

टीसीएस आयोजित स्पर्धेत २८ शाळांमधील १२६ संघांनी सहभाग घेतला. यंदा स्पर्धेत एआय आधारित रिअल टाइम विश्लेषणाचा समावेश करण्यात आला होता. प्रत्येक फेरीनंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीचे विश्लेषण उपलब्ध करून देण्यात आले. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यांसह विविध विषयांवर आधारित प्रश्नांनी स्पर्धेची रंगत वाढवली.यंदा २८व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या स्पर्धेच्या विभागीय फेऱ्या देशातील विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य शॉटगन नेमबाजी स्पर्धा

अभिषेक, समरजीतची अचूकता

। पुणे । प्रतिनिधी ।

ठाण्याचा अभिषेक पाटील तसेच कोल्हापूरचा समरजीत इंगळे यांनी महाराष्ट्र राज्य शॉटगन नेमबाजी स्पर्धेच्या ट्रॅप प्रकारातील दुसऱ्या फेरीत कमालीची अचूकता दाखवली.

अभिषेकचे दोन फेऱ्यांनंतर सर्वाधिक ४६ गुण आहेत. युवा आणि ज्युनियर गटांत अव्वल असलेल्या समरजीतने ५० पैकी ४७ गुण मिळवले आहेत. सोलापूरची अनिका मुसळे ज्युनियर तसेच युवा महिला गटांत पहिल्या क्रमांकावर कायम आहे. ती महिलांच्या खुल्या गटात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या गटात राजकुंवर इंगळेने ४३ गुणांसह पहिला क्रमांक राखला आहे. कोल्हापूर, ठाणे, सातारा आणि सोलापूरच्या नेमबाजांनी लक्षवेधक कामगिरी केली आहे.

दुसऱ्या फेरीनंतर महिला गटामध्ये राजकुंवर इंगळे ४३,ऐश्वर्या पाटील ३८, अनिका मुसळे ३७, युवा महिला गटामध्ये अनिका मुसळे ३७, स्मिता सावंत ३३, रिया पाटील २६, ज्युनियर महिला गटामध्ये अनिका मुसळे ३७, स्मिता सावंत ३३, रिया पाटील २६, पुरुष गटामध्ये अभिषेक पाटील ४६, पृथ्वीराज इंगळे ४३, भूषण मुसळे ४२, युवा पुरुष गटामध्ये समरजीत इंगळे ४७, विहांग शेडगे ३६, हरसिमरन सिंह धामी ३४, ज्युनियर पुरुष गटामध्ये समरजीत इंगळे ४७, रणवीर शिंदे ३६ आणि विहांग शेडगे, मास्टर्स पुरुष गटामध्ये भूषण मुसळे ४२, उदय माळी ३९, कृष्णा दाभाडे ३८आणि रविंद्रसिंह धामी यांनी ३८ गुण पटकावले.

सलग तीन पराभवानंतर भारताला सूर गवसला

शशांकचे दमदार अर्धशतक; कृणाल पंड्याला सामनावीराचा सन्मान

। हाँगकाँग। वृत्तसंस्था ।

हाँगकाँग सिक्सेसमध्ये सलग तीन पराभवानंतर भारतीय संघाला अखेर पहिला विजय प्राप्त करता आला. मिशल रोड ग्राउंडमध्ये रविवारी खेळवण्यात आलेल्या सामन्यात भारताने बांगलादेशचा अखेरच्या चेंडूवर पाच विकेटने पराभव केला.

भारताने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजी निवडली. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने ६ ओव्हर्समध्ये ५ बाद ११६ धावा केल्या. कर्णधार अबू हिदर रोनीने १८ चेंडूंत ८ सिक्स व ३ चौकारांच्या मदतीने नाबाद ६२ धावा केल्या. त्याच्याशिवाय हबीबुर रहमान सोहनने ६ चेंडूंवर १८, सब्बीर रहमानने ४ चेंडूंत १३ आणि चौधरी मोहम्मद रिझवानने ५ चेंडूंत १२ धावांचे योगदान दिले.

भारताच्या वतीने कर्णधार कृणाल पंड्या सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने २ ओव्हर्समध्ये २५ धावा देत ३ विकेट घेतल्या. राहुल त्रिपाठीला एक विकेट मिळाली.

११७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारत शेवटच्या चेंडूपर्यंत खेळ दाखवला. शशांक सिंहने १५ चेंडूंत ७ सिक्स आणि १ चौकारच्या मदतीने ५० धावांची खेळी केली. तो दुर्दैवाने रिटायर्ड हर्ट झाला. राहुल त्रिपाठीने १२ चेंडूंत ३ सिक्स व ३ चौकारांच्या मदतीने ३२, नितीश राणाने ४ चेंडूंत नाबाद १० आणि राहुल तेवतियाने ५ चेंडूंत नाबाद १६ धावांचे योगदान दिले. कृणाल पंड्याला प्लेयर ऑफ द मॅच घोषित करण्यात आले.स्पर्धेत १२ संघांचा समावेश



भारताला सी गटात ठेवण्यात आले असून त्यांना पहिल्या सामन्यात पाकिस्तानकडून ४ विकेटने, दुसऱ्या सामन्यात युएईकडून ६ विकेटने आणि तिसऱ्या सामन्यात इंग्लंडकडून ३ विकेटने पराभवाचा सामना करावा लागला. स्पर्धेत १२ संघांनी भाग घेतला असून रविवारी बांगलादेशवरील विजयानंतर भारत गुणतालिकेत ११ व्या स्थानी पोहचला आहे.

या भारतीय संघात आंतरराष्ट्रीय सामने खेळणाऱ्या खेळाडूंचा भरणा असतानाही आतापर्यंत त्यांची कामगिरी म्हणावी तशी चांगली राहिलेली नाही. त्यांना चक्क कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानकडून पराभवाचा सामना करावा लागल्याने या स्पर्धेच्या तयारीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

दक्षिण आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियाला दे धक्का!

। केप टाऊन । वृत्तसंस्था ।



- तिसरी कसोटी जिंकत मालिकेवर कब्जा
- सायमन हार्मरच्या १० विकेट्स!

दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा तिसरा कसोटी सामना जिंकून ३ कसोटी सामन्यांची मालिका २-१ ने आपल्या नावावर केली आहे. मालिकेतील तिसरा कसोटी सामना केप टाऊनच्या मैदानावर पार पडला.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २८८ धावांचे आव्हान ठेवले होते. पण दक्षिण आफ्रिकेच्या धारदार गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण डाव अवघ्या १११ धावांवर आटोपला. यासह दक्षिण आफ्रिकेने हा सामना १७६ धावांनी आपल्या नावावर केला.

या सामन्यात धावांचा बचाव करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला सुरूवातीपासूनच एकापाठोपाठ एक मोठे धक्के दिले. अवघ्या ४२ धावांवर ऑस्ट्रेलियाचे ६ फलंदाज तंबूत परतले होते. ट्रॅव्हिस हेड अवघ्या १४ धावा करून तंबूत परतला. तर मॅट रेनशॉला खातंही उघडता आलं नाही.

मार्नस लाबुशेन ४, जोश इंग्लिस ४ तर ॲलेक्स कॅरी अवघ्या २, कूपर कॉनोली ० आणि मिचेल स्टार्कही शून्यावर माघारी परतला.कॅमेरून ग्रीनने ११० चेंडू खेळून काढले आणि २७ धावा केल्या.

दक्षिण आफ्रिकेकडून गोलंदाजी करताना सायमन हार्मरने सर्वाधिक ५ आणि कगिसो रबाडाने ३ गडी बाद केले. सायमन हार्मरने दोन्ही डावात मिळून १० गडी बाद केले.

भारत-पाक सामना दिवाळीत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारताचा १९ वर्षांखालील संघ आशिया कप २०२६ स्पर्धा खेळताना दिसणार आहे. १९ वर्षांखालील आशिया कप २०२६ स्पर्धा ओमान देशात खेळली जाणार असून ही स्पर्धा ५ ते १४ नोव्हेंबर दरम्यान खेळली जाणार आहे. भारतीय संघ या स्पर्धेसाठी सज्ज आहे. पहिल्या फेरीसाठी ८ संघांचे दोन गटात विभाजन झाले आहे. पहिल्या फेरीनंतर दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. पहिल्या फेरीसाठी अ गटात भारताचा समावेश असून भारतासह संयुक्त अरब अमिराती, नेपाळ आणि पाकिस्तान यांचा समावेश आहे. तसेच ब गटात बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान आणि मलेशिया हे संघ आहेत.



राष्ट्रीय एकतेचा संदेश देत कळंबोलीत 'रन फॉर युनिटी'

। कळंबोली । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधत कळंबोली येथे आयोजित करण्यात आलेल्या रन फॉर युनिटी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रोडपाली बस डेपो येथून या दौडीला सुरुवात झाली. उत्साहपूर्ण वातावरणात सुरू झालेल्या या दौडीचा समारोप महाराष्ट्र ज्ञानमंदिर शाळा येथे झाला. यामध्ये विविध गृहनिर्माण सोसायट्या, रहिवासी संघटना, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना तसेच राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, अमर पाटील, राजू शर्मा, नगरसेविका मोनिका महानवर यांची उपस्थिती होती. राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, विविध सोसायट्यांचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि कळंबोलीतील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यंग इंडिया राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा | १० किलोमीटर गटात स्वराज एसची बाजी

पुरुषांत लवप्रित तर महिलांत रविनाची बाजी

। ठाणे । प्रतिनिधी ।



अॅथलिट्सतर्फे आयोजित यंग इंडिया राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत पुरुष गटात पुण्याचा लवप्रित सिंग, तर महिला गटात नाशिकची रविना गायकवाड यांनी विजेतेपद पटकावले. दोघांनाही प्रत्येकी एक लाख रुपयांचे रोख बक्षीस आणि गौरवपदक देऊन सन्मानित करण्यात आले.अॅथलिट्सच्या या दुसऱ्या स्पर्धेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध ११ गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत साडेतीन हजारांहून अधिक धावपटूंनी सहभाग घेतला. पहाटेच्या वेळीही असलेले दमट हवामान, चढ-उतार आणि वळणाचे रस्ते यामुळे धावपटूंच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. प्रतिकूल परिस्थितीतही आघाडीच्या धावपटूंमध्ये अवघ्या काही सेकंदांची चुरस पाहायला मिळाली.

पुरुषांच्या २१ किलोमीटर शर्यतीत लवप्रित सिंगने १ तास ६ मिनिटे ३८ सेकंदांत अंतर पूर्ण करत पहिले स्थान मिळवले. राज तिवारीने १ तास ७ मिनिटे १६ सेकंदांत शर्यत पूर्ण करत दुसरा क्रमांक मिळवला. दिनकर महालेने १ तास ८ मिनिटे ४० सेकंदांची वेळ नोंदवत तिसरे स्थान पटकावले.महिला गटात राष्ट्रीय धावपटू रविना गायकवाड आणि अमृता पटेल यांच्यात शेवटपर्यंत चुरस रंगली. रविनाने १ तास २९ मिनिटे २५ सेकंदांत २१ किलोमीटरचे अंतर पूर्ण करत विजेतेपद मिळवले. अमृता पटेलने १ तास २९ मिनिटे ३८ सेकंदांची वेळ नोंदवत दुसरे स्थान मिळवले. तेजस्विनी लंबकर्णेने १ तास ३० मिनिटे १५ सेकंदांत शर्यत पूर्ण करत तिसरा क्रमांक पटकावला.

पुरुषांच्या राज्यस्तरीय १० किलोमीटर गटात स्वराज एसने ३० मिनिटे ४२.७ सेकंदांची वेळ नोंदवत पहिले स्थान मिळवले. अनिल जाधव दुसरा, तर अजय पाल तिसरा ठरला.महिला १० किलोमीटर गटात साक्षी पवारने वेळेसह प्रथम क्रमांक मिळवला. प्रियांका ओक्सा दुसरी, तर कोमल खांडेकर तिसरी ठरली.मुलांच्या १९ वर्षांखालील १० किलोमीटर गटात गोविंद पाडेकर प्रथम, तेजस सपकाळे द्वितीय, तर जय बोऱ्हाडे तृतीय ठरला.मुलींच्या गटात खुशी सिंगने ३९:३९.०९ वेळेसह पहिले स्थान मिळवले. अंजली पंडित (४१:४१.०५) दुसरी, तर वर्षा पाटील (४५:०१.०४) तिसरी ठरली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)